| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २५८ वा | बुधवार, दिनांक ०७ जानेवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# लातूर विकासाच्या सुपरफास्ट ट्रॅकवर; विजय संकल्प सभेत मुख्यमंत्र्यांची विकासाची ग्वाही





**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवारी लातूर येथे आयोजित विजय संकल्प सभेला उपस्थित राहिले असता त्यांनी विकास, नेतृत्व आणि सन्मानाच्या मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका मांडली.

लातूर महानगरपालिकेवर भाजपाचा झेंडा फडकवण्याची मुख्य जबाबदारी आमदार अर्चनाताई पाटील यांच्यावर असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

लातूरच्या राजकीय परंपरेचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, शिवराज पाटील चाकूरकर, शिवाजीराव पाटील निलंगेकर आणि दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्याबद्दल आम्हाला सार्थ अभिमान व आदर आहे. पक्षाच्या पलीकडे जाऊन महाराष्ट्राच्या विकासात मोलाचा वाटा उचलणारे नेते म्हणून विलासराव देशमुख यांच्याबद्दल भाजपाला नेहमीच मोठा आदर राहिला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. दोन दिवसांपूर्वी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या वक्तव्याचा गैरसमज पसरवून विरोधकांनी राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी तत्काळ दिलगिरी व्यक्त केली असून विलासरावजींबद्दल आमचा नितांत आदर आहे, असेही फडणवीस म्हणाले.

लातूर ही नेतृत्व घडवणारी भूमी असल्याचे सांगत त्यांनी शहर व जिल्ह्याच्या विकासासाठी मोठ्या घोषणा केल्या. जलयुक्त शिवार योजनेच्या दुसऱ्या टप्प्याला तातडीने मंजुरी दिली जाईल आणि लातूरकरांना दररोज नळाला पाणी मिळालेच पाहिजे, अशी ग्वाही त्यांनी दिली. २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्मार्ट सिटी, अमृत, पंतप्रधान आवास योजनेसह शहर विकासासाठी सुमारे ५० हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. भूमिगत गटार योजनेसाठी ३०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

घनकचऱ्याबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, घनकचरा हा कचरा नसून संपत्ती आहे. त्यावर प्रक्रिया करून विविध लाभ घेता येतात आणि यासाठी केंद्र सरकारकडून मोठा निधी देण्यात आला आहे. लातूरकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या जिल्हा रुग्णालयासाठीही आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला असून लवकरच हे रुग्णालय पूर्णत्वास येईल. येथे सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार मिळतील. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्यात येत असून सुमारे २४०० आजारांवर मोफत उपचार शक्य झाले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फूट उंच पुतळ्यासाठी पहिल्या टप्प्यात १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शहरातील नाट्यगृहासाठी १५ कोटी रुपयांचा निधी देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्या शिवाजी महाराज चौकात होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडीकडे लक्ष वेधत त्यांनी चौकाचे सुशोभीकरण करून आधुनिक व सुलभ वाहतूक व्यवस्था उभारण्याचे आश्वासन दिले. अर्चनाताई पाटील यांनी उपस्थित केलेल्या रुद्रभूमीच्या प्रश्नालाही लवकरच मंजुरी देऊन तो मार्गी लावला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

लातूरच्या कोच फॅक्टरीमुळे स्थानिक नागरिक व युवकांसाठी दहा हजारांहून अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगत त्यांनी समृद्धी महामार्गाप्रमाणेच लातूर–कल्याण महामार्गालाही औद्योगिक विकासाचा कणा बनवण्याचा निर्धार व्यक्त केला. हा महामार्ग लातूरचा औद्योगिक महामार्ग ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लातूर महानगरपालिका परिसरात शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक उभारण्याची जबाबदारी महापालिकेऐवजी थेट राज्य शासन घेईल, असेही त्यांनी जाहीर केले.

लाडकी बहीण योजना कदापि बंद होणार नसून आता 'लखपती दीदी' घडवण्यावर भर दिला जाणार आहे. सध्या ५० लाख लखपती दीदी तयार झाल्या असून एक कोटी लखपती दीदी बनवण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पक्की घरे देण्यात आली असून लाभार्थ्यांना मालकी हक्काचे पट्टे देण्यात येणार आहेत. कच्च्या घरांचा अहवाल मागवून सर्वांना पक्की घरे देण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

भाषणाच्या शेवटी येत्या १५ तारखेला कमळाच्या चिन्हासमोरील बटण दाबून मोठ्या संख्येने भाजपाच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरकरांना केले.

## ग्रंथालय हे विद्यार्थ्यांचे बौद्धिक सामर्थ्य वाढविणारे केंद्र : प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे

**बाभळगाव /प्रतिनिधी :** अवांतर वाचनामुळे विचारक्षमतेचा विस्तार होऊन व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. नियमित वाचनाची सवय विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांसह आत्मविश्वास वाढवते. ग्रंथालयातील विविध साहित्याचा अभ्यासक्रमाबरोबर समतोल वापर विद्यार्थ्यांनी करावा. वाचनाशी नाते जपणारा विद्यार्थीच समाजात वैचारिकदृष्ट्या सक्षम नागरिक घडतो. वाचनामुळे केवळ ज्ञानवृद्धीच होत नाही तर व्यक्तिमत्त्व घडण्याची प्रक्रिया अधिक समृद्ध होते. नियमित वाचनातून चिकित्सक विचारशक्ती, भाषिक कौशल्ये आणि आत्मविश्वास वाढतो. वाचनाची सवय ही आयुष्यभर साथ देणारी संपत्ती आहे. सर्व विद्यार्थ्यांना वाचनाशी मैत्री करावी. ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, वैचारिक आणि सांस्कृतिक जडणघडणीचे प्रमुख केंद्र त्यातूनच विद्यार्थी घडतो. – असा विश्वास प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी व्यक्त केला.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे मराठी विभाग आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अवांतर वाचन संकल्प सप्ताह च्याउद्घाटन प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, महाविद्यालयामध्ये वाचन सप्ताहाचे आयोजन करून सप्ताहभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये पुस्तक प्रदर्शन, वाचन प्रेरणा सत्रे, चर्चा परिसंवाद, निबंध लेखन स्पर्धा, कथालेखन स्पर्धा, वाचन अनुभव कथन यांचा समावेश असणार आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मराठी विभाग प्रमुख डॉ. जयदेवी पवार, अभ्यासक्रमा बाहेरील वाचनाचे महत्त्व, व्यक्तिमत्त्व विकासात वाचनाची भूमिका, विचारक्षमतेचा विस्तार, भाषिक समृद्धी आणि सामाजिक जाणीव वाढविण्यात अवांतर वाचन कसे उपयुक्त ठरते याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

## लातूर ग्रामीणमधील चारशे आशा स्वयंसेविकांना आमदार कराड यांनी दाखवला 'आशा' चित्रपट

**लातूर/प्रतिनिधी :** ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा त्यांची कहाणी मांडणारा राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्राप्त आशा हा सिनेमा आ. रमेशआप्पा कराड यांच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील चारशे आशा स्वयंसेविकांना मंगळवारी दाखवण्यात आला. यावेळी युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते. सिनेमागृहातून चित्रपट पाहून बाहेर आल्यानंतर ऊर्जा मिळाल्याचे प्रत्येक आशा स्वयंसिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.









ग्रामीण भागातील महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये आशा स्वयंसेविकांचे मोठे योगदान असून त्यांचे कार्यावर प्रकाशझोत टाकणारा आणि ग्रामीण भागाचे वास्तव सांगणारा आशा हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला या सिनेमात अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी आशा स्वयंसेविकेच्या भूमिकेला न्याय दिला असून पगारीसाठी नव्हे तर स्वतःच्या समाधानासाठी काम करणाऱ्या (मालती) आशा हिच्या चेहऱ्यावर संयम, डोळ्यात तगमग आणि आतून असणारी जिद्द दिसून आली. चालत रहा पुढे हे गीत प्रेक्षकांना ऊर्जा देऊन जाते.

चित्रपट सुरू होण्याअगोदर उपस्थित आशा स्वयंसेविका यांच्याशी संवाद साधताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, आशा स्वयंसेविकांचे समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणारे मोठे कार्य आहे या कार्याची आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी दखल घेतली असून प्रेरणा मिळावी यासाठीच आशा चित्रपट दाखविण्याचा सुयोग त्यांनी घडून आणला आहे असे बोलून दाखवले.

याप्रसंगी भाजपाचे वसंत करमूडे, चंद्रकांत कातळे, भाऊसाहेब गुळबिले, ओम चव्हाण, राम भताने, दिलीप पाटील, सुरेखा पुरी, अनुसया फड, शीला आचार्य यांच्यासह स्वयंसेविका जिल्हा समूह संघटक संगीता डावरे, श्रीमती बालिका बिराजदार, तालुका संघटक आढळकर, रेखा कौटबे, जयश्री थोरमोटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती यावेळी तब्बल चारशे आशा स्वयंसेविकांनी चित्रपट पाहण्याचा आनंद घेतला.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**राज्यात बुधवार नंतर थंडीच्या कडाका वाढणार...!**



## चिमटा दयाचा

**मुलभूत प्रश्नाला बगल देत प्रचार वेगाने चालू आहे ! कचरा, पाणी, रस्ते, दिवाबत्ती बाबत गप्प आहेत !!**

## प्रभाग ९ मधील योगेश स्वामी, तबस्सुम शेख, सपना किसवे, सगरे इसरार यांना विजयी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** लातुर शहर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीकडून लातुर शहरातील विविध प्रभागात जाहीर प्रचार सभांचा धडाका उडवून दिला असून या सभाना मतदार नागरिक बंधू भगिनींचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे.

शहरातील प्रभाग क्र. ८ व प्रभाग क्र. ९ मधील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार प्रचारार्थ मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी ६:०० वाजता लातुर शहरातील महात्मा बसवेश्वर महाविद्यालया समोर जाहीर प्रचार सभा पार पडली. या जाहीर प्रचार सभेसाठी आमदार, महाराष्ट्र विधानसभा, माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यासह माजी आमदार वैजनाथ शिंदे, मोईज भाई शेख यांची उपस्थिती होती.



यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, लातुर मनपाच्या सार्वत्रिक निवडणूक निमित्ताने आपण एकत्रित आलेले आहोत. राज्यात २९ मनपाची निवडणूक रणधुमाळी सुरू असून १५ तारखेला मतदान होईल व १६ ला निकाल लागेल तेव्हा लातूरची सूत्र कुणाच्या हातात द्यायची, लातूरच्या तिजोरीच्या चाव्या कुणाच्या हातात द्यायच्या याचा निर्णय आपल्याला आता करायचा आहे असे ते म्हणाले.

आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेबानी, आदरणीय विलासराव देशमुख साहेबाना घडवले, आदरणीय विलासराव देशमुख साहेबानी, आदरणीय दिलीपराव देशमुख साहेबांना घडविले आणि आदरणीय दिलीपराव देशमुख साहेबांनी आम्हाला घडविले हा काळ तब्बल सहा दशकांचा पण या काळात आम्ही आपल्याशी कधी विश्वासघात केला नाही. आम्ही आपल्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. आज आपण कुठेही गेलात तर लातुर म्हटले की, आदरणीय विलासराव देशमुख साहेबांचे लातुर अशी ओळख आहे, पण विरोधकांकडून ही ओळख पुसण्याची भाषा येथे येऊन काहीजण करू लागले आहेत, आम्ही तर आमचे आदरणीय व्यक्तीमत्वाचे नाव घेतोच पण विरोधकानी देखील आदरणीय विलासराव देशमुख साहेबांचे नाव घेतल्याशिवाय त्यांचे भाषण पूर्ण होत नाही हे यातून दिसते.

लातुरात बाहेरील लोक येऊन लातूरचे लचके तोडण्याचा प्रयत्न करीत असून त्यांचे हे प्रयत्न आपल्याला एकत्रित येत हाणून पडायचे आहेत असे ते म्हणाले. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, लातुर शहरासाठी निधी खेचून आणण्यासाठी आपले ट्रिपल इंजिन सरकार असून आपल्याला निधी आजीबात कमी पडणार नाही याची ग्वाही त्यानी दिली. राज्यातील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार असणारेच एकमेकांवर भ्रष्ट असल्याचे आरोप करीत असून त्यांना सर्वसामान्य जनतेपेक्षा त्यांच्या खुर्चीची चिंता अधिक आहे. उमेदवारांनी एकमेकात समनव्य राखावा, एकत्रित प्रचार करावा,प्रत्येक घर व मतदारापर्यंत पोहचावे जेणेकरून आपले उमेदवाराणा विजयपासून कोणीही रोखू शकणार नाही विश्वास आमदार अमित देशमुख यांनी उपस्थितांना दिला.

दर निवडणूकिला पक्ष बदलणारे लिंबू टिम्बु या निवडणुकीत आपल्या समोर मत मागण्यासाठी येतील आपण सावध राहावे या सर्व गोष्टीचा आपण लातुर वासीयांनी विचार करावा आणि सुरक्षित, भ्रष्टाचार मुक्त,आणि प्रगतशील लातुरसाठी काँग्रेस व वंचित बहुजन अघाडीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिकक्याने विजयी करून लातूरच्या महानगरपालिकेत पाठवावे असे आवाहन शेवटी आमदार देशमुख यांनी उपस्थित सर्व मतदार बंधू-भगिनी नागरिकांना केले. यावेळी बोलताना काँग्रेसचे नेते मोईज भाई शेख यांनी प्रभाग ८ व प्रभाग ९ मधील राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन अघाडीच्या सर्व उमेदवाराना येणाऱ्या १५ जानेवारीला आपले बहुमोल मत देऊन प्रचंड बहुमताने विजयी कररावे व लातूरचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी पुढाकार घ्यावा व सर्वाना विजयी करून आपल्या सेवेसाठी महानगरपालिकेत पाठवावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश सचिव मुफ्ती वसीम म्हणाले की, माजी मंत्री, आमदार अमित देशमुख एका बाजूला गोरगरिबांना त्यांचा हक्क देणारे आणि भ्रष्टाचाऱ्यांना त्यांची जागा दाखवणारे नेतृत्व असून यांच्या सोबत आज आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडीची साथ असून यातून आपले व आपल्या कुटुंबाचे कल्याण करणारी आघाडी आपण या निवडणुकीत पाहत आहोत. आपल्याला कुणासमोर न झुकता, न घाबरता सर्वधर्म समभाव जपणाऱ्या आणि आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या विचाराने मार्गक्रमण करणाऱ्या काँग्रेस व बाळासाहेब आंबेडकर यांचे विचार याने प्रेरित वंचित बहुजन अघडीच्या सर्व उमेदवारांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

यावेळी बोलताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले की, आता लातुर महानगरपालिका निवडणूका लागल्या आहेत आणि या निवडणुकीत प्रचार करताना सुसंकृतपणाचा आव आणत निलंग्याचे आमदार लातुरात मिरवत आहे. ज्या माणसावर आर्थिक गैरव्यवहार केल्याचे फसवणूक केल्याचे गुन्हे दाखल आहेत ते सुसंस्कृतपणा लातुरात येऊन शिकवत आहे असे म्हणत आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांना लक्ष केले. वर्षाला २ कोटी युवकांना नौकऱ्या देणार म्हणणाऱ्यानी १२ वर्षे होऊन गेले तरी अद्याप बेरोजगारी दूर करणे तर सोडाच उलट सुशिक्षित बेरोजगार युवकांचे प्रमाण वाढवले.

या संपूर्ण परिस्थितीचा विचार करता आपण वेळीच सावध व्हावे आणि काँग्रेस व वंचित बहुजन अघडीच्या सर्व सामान्य माणसातील आपल्या उमेदवारांना मत देऊन आपल्या प्रभागाच्या आणि लातूरच्या विकासासाठी मनपात विजयी करून पाठवावे असे आवाहन केले.

दरम्यान प्रभाग ८ आणि प्रभाग ९ मधील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडी उमेदवारांनी या जाहीर प्रचार सभेत आपला परिचय देत मनोगत व्यक्त केले आणि बहुमताने आपल्याला विजयी करून लातुर शहर महानगरपालिकेत पाठवावे व सेवेची संधी द्यावी असे आवाहन उपस्थित सर्व मतदार बंधू भगिनी व नागरिकांना यावेळी केले. तसेच यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. लातुर शहर महानगरपालिका निवडणुक निमित्ताने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या प्रभाग ८ मधील पतंगे अभिषेक,घंटे रिहानाबेगम, झिपरे श्रावणी,उटगे स्नेहल तर प्रभाग ९ मधील स्वामी योगेश,शेख तब्बसुम,किसवे सपना,सगरे ईसरार या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या या जाहीर प्रचार सभेला लातुर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष-अभय साळुंखे,काँग्रेस पक्ष अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष-प्रा.प्रवीण कांबळे,हमीद शेख,श्रीकांत उटगे,अमर राजपूत, वेंकटेश पुरी,रमेश बिसेन,संतोष बिरादार,रामेश्वर बिरादार,रफिक शेख,मीनाताई सूर्यवंशी यांच्यासह लातूर शहर महानगर पालीका निवडणूककीतील राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार तसेच पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रभागातील मतदार बंधू-भगिनी, नागरीकानी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## प्रचाराला वेग आला!

राज्यात महानगरपालिका निवडणुक प्रक्रिया सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात नेत्यांचे लक्ष प्रचाराकडे लागले आहे. कोणत्या बाबीचा आवलंब केल्यास आपल्याच पक्षाला मतदार स्विकारेल याची चिंता लागून आहे. सरकारने महिलांसाठी लाडकी बहिण योजना लागू केली ती फायद्याचा ठरली. यापेक्षाही आणखीन एखादी स्कीम काढून आकर्षिले जाते का याचीच चापचणी सुरू असल्याचे दिसून येत आहे. राज्यात विकासाला कमी प्राधान्य व बंडखोरीची अधिक चर्चा होताना दिसून येत आहे. महानगरपालिका म्हणजे मोठ्या लोकसंख्येची गावे, त्यात हद्द वाढीव असते. नवीन हद्द सामावली तर अनेक सुविधा पुरवाव्या लागतात. शहरात सर्वात महत्वाची बाब व जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न पाणी पुरवठ्याचा असतो. पाणी पुरवठा व्यवस्थित असेल किंवा या योजनतेस प्राधान्य दिले तरच त्या पक्षाकडे मतदार आकर्षिले जातात. त्यामुळे राज्यात सत्ताधारी हे अजूनतरी जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे आकर्षित करण्याकडे वळले नाहीत. केवळ बंडखोरांना कसे शांत करता येईल याचा विचार करताना दिसून येत आहे. जनतेचे मुलभुत प्रश्नाकडे लक्ष देवुन त्या कशा प्रकारे सोडविता येईल यावर अजूनतरी कोणाचे लक्ष वेधले नाही. समस्या शहरात अधिक नसतात. ज्या काही समस्या आहेत त्याची सोडवणुकीसाठी मोठ्या तरतुदीची गरज भासते ती गरज कशी पुर्ण कशी करणार याकडे लक्ष दिसून येत नाही. सध्याला महानगरपालिकेची निवडणुकीत राज्यात सत्ताधारी भाजपाचे जवळपास साठ उमेदवार बिनविरोध निवडले गेले आहेत. वास्तविक ज्याची सत्ता असते त्या बाजूने सर्व झुकते माप असते. त्यामुळे नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यास चांगले यश मिळाले आहे. त्याच अनुसंगाने महागनरपालिकेतसुद्धा यश मिळेल असे समजले जात आहे. वास्तविक निवडणुकीत पक्के गणित मांडता येत नसते तरी यश मिळावे म्हणून प्रयत्न केले जातात. सध्याला सर्वपक्षांना बंडखोरीचा परिणाम भोगावा लागणार आहे. सत्ताधारीत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी जे यशाचे गणित मांडले असेल तर यदाकदाचित चुकीचे ठरणारे असणार आहे. निवडणुकीपुर्व केवळ अंदाज व्यक्त केले जातात. योग्य का बरोबर, यापेक्षा एक दिशादर्शक समजले जाणारे अंदाज यावेळी आश्चर्यकारक ठरू शकतात. परिस्थिती तशी निर्माण झाली. उमेदवारीत आर्थिक गैरप्रकाराचा आरोप हा सर्वात मोठा कलंक आहे. उमेदवार कदाकदाचित पराभुत झाला तरी चालेल मात्र पक्षाची बदनामी होता कामा नये. राष्ट्रीय विचाराच्या पक्षावर आरोप होत असतील तर सर्वात मोठी लाजीरवाणी बाब आहे हे लक्षात घेतले पाहिजे. सध्याला भाषण देणे किंवा मार्गदर्शन करणे सोपे आहे याला आलिकडे फारसी किंमत नाही हे ओळखले पाहिजे. महानगरपालिकेची निवडणुक ही यासाठी महत्वाची असते कारण यातून आगामी विधानसभेसाठीची चापचणी होत असते. महानगरातील मतदार हा हुशार समजला जातो. अधिक शिकलेली मंडळी असते. त्यामुळे विचारपुर्वक मतदान होते. काही दिवसापासून मतदानाची टक्केवारी वाढली आहे. ही टक्केवारी सत्ताधाऱ्यासाठी फायद्याची दिसून आली आहे. याही महानगरपालिकेच्या निवडणुकीत किती मताची टक्केवारी वाढते हेही पाहाणे आवश्यक आहे. उमेदवारी मागणारे अनेकजन असतात. वाढती मागणी असताना निष्ठावंतास डावलणे योग्य नाही. हे पक्ष प्रमुखांनी ओळखले पाहिजे. पुर्वी वार्ड निहाय उमेदवार निवडले जात आता प्रभागनिहाय असल्याने एका-एका प्रभाग तीघे व चौघे उभारली आहेत. प्रभागातील कामे कोणाकडून करून घ्यावेत हा मोठा प्रश्न निर्माण होतो. त्याच प्रमाणे क्रॉस मतदान होण्याची शक्यता योवळी नाकाराता येवु शकत नाही. पुर्वी कामात गैरप्रकार झाल्याचे बोलले जात होते. आता उमेदवारी देण्यात आर्थिक गैरप्रकार झाल्याचे उघड बोलत आहेत. याचा परिणाम काय तर निष्ठावंत बंडखोरीकडे वळतात. पर्यायी फळी निर्माण करतात. शह देण्याचा प्रयत्न होतो. यात नुकसान हे पक्षाचे होते. हे पक्षवरिष्ठांना दिसून येत नाही का? मुळात निवडणुकीत आरोप-प्रत्यारोप होताना दिसून येतात. हे होतच असते, मात्र उमेदवारी देताना आर्थिक गैरकारभाराचा आरोप होणे ही गंभीर बाब आहे. या बाबत कोणताही पक्ष असो चौकशी झाली पाहिजे. अशा प्रकाराने पक्षाला यदाकदाचित मोठी किंमत मोजावी लागणार आहे असे चित्र सध्याला दिसून येत आहे. राज्यात जेवढ्याकाही महानगरपालिका मोठ्या शहरातील आहेत तेथे बंडखोरी उघड झाली आहे. याचा परिणाम पक्षासाठी चांगला होणार नाही हे आतापासून लक्षात घेतले पाहिजे. तसे अनेक ठिकाणी निवडून आलेले नगरसेवक पाच वर्षांनी जनतेला भेटत असतात ही वस्तूस्थिती अनेकांनी अनुभवली आहे. त्यामुळे सर्वच पक्षाने निष्ठावंतास डावलणे योग्य नाही. उलट त्यांचे मार्गदर्शन घेणे पक्षहितासाठी योग्य ठरणारे असते. त्यामुळे भाजपा असो किंवा अन्य कोणत्याही पक्षात बंडखोर हे परवडणारी नाही. मोठ्या शहरातील महानगरपालिकेचा निकाल सुद्धा आश्चर्य कारण याकारणासाठी दिसून येणार आहे. मुळात कार्यकर्ते पुर्वी सारखे कोठे दिसून येतात. पुर्वी उभारणारे हे स्वतः होऊन उभा राहात नव्हते तर जनताच उभा करीत होती. आता परिस्थिती उलटी झाली आहे. त्यात पक्षासाठी पुर्वी कार्यकर्ते जसे तन, मन व धनाने काम करीत होते ती परिस्थिती आज राहिली नाही हे सर्वजनच मान्य करतात. त्यामुळे आज सर्वात मोठा पेच हा बंडखोरांचा उभा राहीला आहे. ते गप्प बसले तर ठिक नसता काय करतील हे सांगता येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीत बंडखोरी हा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे पक्षप्रमुखांनी विचार करण्याची वेळ आली आहे. आता स्थानिक उमेदवारी देणारी काही तरी बोलून सावरासावर करीत आहेत. जे सत्य आहे ते जनतेला कळाले आहे. बंडखोर एकत्र येऊन बंड पुकारता असतील तर ते पक्षासाठी भूषणीय बाब नाही. त्यामुळे यावेळी बंडखोराची किमया पक्षाला कळणार नाही. आम्हाला नाही तर तुम्हालाही नाही असे चित्र दिसून येणार आहे. त्यामुळे यात गैरकारभार करणाऱ्याची माहिती घेतली पाहिजे. चौकशी झाली पाहिजे. नसता जनता माफ करणार नाही हे निश्चित.

# मुलभूत सुविधा सक्षम करण्यावर भर

## भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर

**लातूर/प्रतिनिधी :** भाजपाच्या नेतृत्वात शहरात विकास कामांना गती मिळाली आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा भूमिगत गटार योजना, आरोग्य, शिक्षण यासह मुलभूत सुविधा सक्षम करण्यावर भाजपाने भर दिला असून ही कामे पुढे घेवून जाण्यासाठी भाजपाला पुन्हा एकदा संधी द्या असे आवाहन भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.



भाजपाचे प्रभाग १८ मधील उमेदवार ऋषिकेश राजे, सौ. सत्यवती चेवले, सौ. अदिती पाटील कव्हेकर व प्रभाग क्रमांक ५ मधील उमेदवार योगेश शिरसाट, सुवर्णा येलाले, आएशा शेख, शिवकुमार बिराजदार यांच्या प्रचारार्थ अजित पाटील यांनी ठिकठिकाणी पदयात्रा काढून नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, भाजपाच्या माध्यमातून लातूर शहरात २५ हजार घरांना पिण्याचे शुध्द पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. १३५०० नागरिकांना हक्काचे घर तसेच ७०हजार लाडक्या बहिणींना आधार देण्यात आला आहे. विकास, विश्वास आणि जनकल्याण साधण्यासाठी भाजपा हा एकमेव पर्याय आहे. भाजपाच्या माध्यमातूनच प्रभागात रस्ते, पाणी पुरवठा योजना, स्वच्छता व आरोग्य या सुविधा लाभल्या आहेत. जनकल्याणाचे हे कार्य अधिक गतीने पुढे नेण्यासाठी भाजपाच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहनही त्यांनी केले.

या बैठकांना भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच प्रभागातील नागरिक आणि मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भाजपाकडे लातूरच्या विकासाचा स्पष्ट दृष्टीकोन :सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर

**लातूर/प्रतिनिधी :** भाजपाकडे विश्वासार्ह नेतृत्व आहे. लातूर शहराच्या विकासाचा स्पष्ट दृष्टीकोन असून विकासाचा रोडमॅप तयार आहे, असे प्रतिपादन भाजपा नेत्या डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले. भाजपाची प्रभाग क्रमांक १६ मधील उमेदवार गिरीष पाटील, शितलताई मालू, राजश्रीताई बाहेती, विनय जाकते, प्रभाग क्रमांक ६ गणेश गवारे, ज्योती आवसकर, मिना गायकवाड व गौरव काथवटे तर प्रभाग क्रमांक ८ मधील उमेदवार शैलेश गोजमगुंडे, विद्या सागावे, वंदना भराडिया आणि शैलेश स्वामी तर प्रभाग २ मधील उमेदवार अमर पटेल, रवि सुडे, निर्मला कांबळे, पुष्पा भडीकर यांच्या प्रचारार्थ आयोजित बैठकीत डॉ. सौ. अर्चना पाटील चाकूरकर बोलत होत्या. यावेळी निवडणुक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांची उपस्थिती होती.



उपस्थितांशी संवाद साधताना डॉ. सौ. अर्चनाताई म्हणाल्या की, भाजपाने विकास काय असतो हे जनतेला दाखवून दिले आहे. मागील ११ वर्षात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झालेली विकासकामे पाहात आहोत. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गतीने विकासकामे करत आहेत. विकासाची हीच गती लातूरमध्ये कायम ठेवण्यासाठी महापालिकेत भाजपाची सत्ता येणे आवश्यक आहे. त्यामुळे मतदारांनी भाजपाच्या पाठिशी उभे रहावे, असे आवाहन डॉ. सौ. अर्चनाताई पाटील यांनी केले. या बैठकांना सुरेश पंडीत, व्यंकट वाघमारे, तुकाराम माने, संतोष भालेराव, शुभम टेकाळे, परवेज पटेल, विनोद गडीमे, डॉ. संतोष भडीकर, अनिल सूर्यवंशी, रवी नाईकवाडे, मजहर पटेल, प्रसाद साळुंके, किशोर साळुंके यांच्यासह दोन्ही प्रभागातील नागरिक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनपा निवडणुकीत काँग्रेस व वंचीत बहूजन आघाडीला बहूमताने निवडूण दयावे

## - आमदार अमित विलासराव देशमुख

**लातूर/प्रतिनिधी :** सध्याच्या काळात भारतीय जनता पक्षाचे नेते ज्या पद्धतीची वक्तव्ये करीत आहेत, त्यांना त्याच भाषेत उत्तर देण्याचे सल्ले मला दिले जात आहेत.

परंतु, अशा शिवराळ संस्कारात मी वाढलेलो नाही आणि ही लातूरची संस्कृतीही नाही, असे सांगून लातूरची सुसंस्कृत परंपरा कायम राखण्यासाठी आणि विकासाला गती देण्यासाठी महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी केले.

लातूर शहरातील विविध समाज घटकांच्या प्रतिनिधी सोबत येथील साळाई मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या व्यापक बैठकीत आमदार अमित विलासराव देशमुख बोलत होते. यावेळी व्यासपीठावर, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे, शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, ॲड. उदय गवारे, माजी महापौर दीपक सुळ, श्री मुस्कावाड, सर्वश्री प्राध्यापक सुधीर अनवले, भारत काळे, रंगनाथ घोडके, संभाजी सूळ, डॉ. संजय मोरे, बाळासाहेब देशपांडे, सुरेश राठोड, लक्ष्मण दावणकर, राजकुमार झिपरे, सुरेश लहाने, प्रभाकर केंद्रे, प्रदीप राठोड, केतन हलवाई, भाऊसाहेब शेंद्रे, प्रकाश मिरगे, रामकिसन मदने, हरिश्चंद्र पांचाळ, संजय बेल्लाळे, अजित निंबाळकर, भगवान माकणे, रितेश भीसेण, भास्कर तामटे, सौ उषा आडे सुरेश चव्हाण, रामकृष्ण मदने, विजयकुमार साबदे, व्यंकटेश पुरी, प्राचार्य एकनाथ पाटील, प्राचार्य पी.एन सगर, भाऊसाहेब शेंद्रे, प्रकाश मिरगे, सुनील पडिले, रामदास

चव्हाण, २१ शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, बालाजी मुस्कावाड, ठोंबरे

बाळकृष्ण, धायगुडे, अनुप शेळके, प्रदीप राठोड, योगेश स्वामी, सुभाष घोडके, शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष विष्णुदास धायगुडे आदिसह लातुर शहरातील कुंभार, गोसावी, कासार, वासुदेव, सुतार, लोहार, वडार, गवंडी आधी विविध समाज प्रतिनिधीं उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आमदार देशमुख म्हणाले की, लातूर शहराचा आत्मा सर्वधर्म समभावाचा आहे. यामुळे येथे शांतता आणि विकासाला गती मिळत आहे. यासाठी या ठिकाणचे सामाजिक एकोप्याचे अनुकुल असलेले वातावरण कायम राखू, विकासाची येथील गती कायम




राखण्यासाठी महानगरपालिका निवडणुकीत येथील सुजाण नागरिकांनी काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या सर्व उमेदवारांना भरघोस आशीर्वाद देऊन विजयी करावे, असे आवाहन माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले आहे.

लातूरातील प्रत्येक समाज घटक सकारात्मक आहे, त्यामुळेच मागच्या ५० वर्षापासून येथे लोकप्रतिनिधी म्हणून योग्य व्यक्तीची निवड होत राहिली आहे. आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर, आदरणीय विलासराव देशमुख साहेब आणि अलीकडच्या काळात मी स्वतः लातूरचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना जनतेच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला नाही, ही परंपरा आपल्याला पुढे घेऊन जायची आहे, लातूर महापालिका निवडणूक जाहीर होण्यापूर्वीपासूनच, लातूरच्या भविष्यातील वाटचालीसाठी नेमके काय करायला हवे यासंदर्भात विविध समाज घटकांच्या बैठका घेऊन त्यांच्या सूचना आणि मागण्या नोंदवून घेतले आहेत.

या सर्व समाज घटकांच्या प्रतिनिधींची प्रत्यक्ष भेट व्हावी यासाठी आज मराठा, माळी, परीट, न्हावी, वडार, सुतार, गोसावी, कासार, कुंभार, गवंडी, वासुदेव, लोहार, बंजारा, गवळी, धनगर, भावसार, महादेव कोळी, यलम, रजपूत, ब्राह्मण, टकारी, जोशी, तेली, शिंपी, गुरव, वंजारी, भोई, सोनार, आदी समाजाच्या प्रतिनिधी सोबत आजची व्यापक बैठक घेत आहोत.

इतर समाज प्रतिनीधींच्याही टप्याटप्याने बैठका होणार आहेत. या सर्व समाज घटकांनी ज्या काही मागण्या आणि सूचना केल्या आहेत, सर्वांची नोंद आम्ही घेतल्या असून महापालिका निवडणूक जाहीरनामामध्ये त्यापैकी काही ठळक सूचना नोंदवण्यात आले आहेत, काँग्रेस वंचित बहुजन आघाडीची सत्ता महापालिकेत आल्यास या सर्व सूचनांची अंमलबजावणी केली जाईल अशा आश्वासन यावेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी यावेळी बोलतांना दिले.

लातूरकरांनी आजवर नेहमीच आम्हाला साथ दिली आहे, ती साथ पुढेही कायम राहणार याचा मला विश्वास आहे, असे सांगून काही सहकारी निवडणूक काळात आम्हाला सोडून गेले असले तरी मी त्यांना सोडलेले नव्हते, हे आवर्जून आमदार देशमुख यांनी यावेळी सांगितले. सध्या राज्यातील राजकारणाचा स्तर खालावत असल्याचे नमूद करून आणि निवडणूक काळात उमेदवार पळवणे, त्यांना पैशाचे अमित दाखवणे, त्यांना मारहाण करणे, असे प्रकार सत्ताधारी मंडळीकडून केले जात आहेत, गंभीर बाब आहे, खरे तर सत्ताधारी भाजपचे मंडळी एवढ्यावरही थांबत नाहीत, त्यांना फक्त काँग्रेसचा पर्याय करायचा नाही तर काँग्रेसच्या सर्वधर्मसमभावाच्या विचाराचा खून करावयाचा आहे, त्यांची ही मनोवृत्ती राज्याला आणि देशाला विघातक असल्याचे आमदार देशमुख यांनी यावेळी बोलतांना म्हटले आहे.

सध्याच्या काळात भारतीय जनता पक्षाचे नेते ज्या पद्धतीची वक्तव्य करीत आहेत, त्याच भाषेत त्यांना उत्तर दिले जावे असे काही सहकारी सुचवत आहेत परंतु, या संस्कारात मी वाढलेलो नाही आणि लातूरची ही ती संस्कृती नसल्याचे आमदार देशमुख यांनी म्हटले. लातूरची संस्कृती जपून ठेवण्यासाठी येथे विकासाला गती देण्यासाठी लातूर महापालिका निवडणुकीतील काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन करून, हे सर्व उमेदवार समाजाभिमुख, आणि कर्तव्य तत्पर आहेत, लातूर शहराचा त्यांच्याकडून विकास करून घेण्याची हमी मी घेत आहे असे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले. या कार्यक्रम प्रसंगी प्रारंभी प्रास्ताविक प्रा, एकनाथ पाटील यांनी केले, ड.उदय गवारे यांनी मनोगत वयक्त केले, सूत्रसंचालन प्रा. सुधीर अनवले यांनी तर आभार अजित निबाळकर यांनी मानले.

## आपली झोप आणि आरोग्य



गेले काही दिवस मी झोपेच्या शास्त्राचा अभ्यास करीत आहे .झोप हा आयुष्यातील एक फार महत्त्वाचा भाग आहे. आपले सर्व मानसिक आणि शारीरिक आरोग्य या झोपेवर अवलंबून असते .पूर्वीची जी म्हण आहे की ''लवकर निजे, लवकर उठे ,त्याला आरोग्य संपत्ती लाभे ''ही म्हण अतिशय योग्य आहे .परंतु आजकालच्या जमान्यात हे शक्य होत नाही. झोपायला आपल्याला किमान दहा वाजतात आणि मग त्या प्रमाणात चांगली झोप जर झाली नाही तर उठायलाही उशीर होतो. ताजेतवाने वाटत नाही .झोप झाल्यानंतर ताजेतवाने वाटणे आवश्यक आहे.

झोपेचे साधारणपणे तीन भाग असतात. एक हलकी झोप,दुसरी गाढ आणि तिसरी रेम (ठएच). झोप लागण्यासाठी जो वेळ लागतो आणि शांतपणे शरीर झोपेच्या आधीन होते ती आपली हलकी झोप असते आणि त्यानंतर मेंदू ताजातवाना होण्यासाठी, आपले स्नायू बलवर्धक होण्यासाठी जी शरीराला प्रचंड विश्रांतीची आवश्यकता असते ती या गाढ झोपेत मिळते .म्हणजे गाढ झोपेमध्ये आपल्याला काहीही आठवत नाही. आपल्याला या गाढ झोपेची अतिशय गरज असते आणि ही गरज भागवण्यासाठी आपल्याला वेळेचे नियोजन करावे लागते. आहाराचे नियोजन करावे लागते. आणि योग्य प्रमाणामध्ये गाढ झोप लागली तर शरीर सकाळी उठल्यानंतर ताजेतवाने राहते. आपल्या भावनिक गरजांसाठी आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी शांत झोप अत्यंत आवश्यक आहे. केवळ ध्यानधारणा ,प्राणायाम एवढ्यावर भर न देता आपलं आरोग्य किती सुंदर, उत्तम राहील यावरही तितकाच भर दिला पाहिजे त्यामुळे आहार विहारावर नियंत्रण ठेवले पाहिजे. हे नियंत्रण शक्यतो नैसर्गिक असावे .आपल्याला चांगले खाण्याचीच इच्छा व्हावी ,आपल्याला चांगले विचार करण्याची इच्छा व्हावी अशा प्रकारचा आहार विहार असेल तर आपली झोप चांगली होईल आणि उपासनेम ध्ये आपली चांगली प्रगती होईल.

साधारणपणे सर्वसामान्य माणसाला आठ तास झोपेची गरज आहे. त्यातली सुमारे एक चतुर्थांश झोप ही गाढ झोप असली पाहिजे. रेम काळामध्ये आपले मन जागृत असते आणि आपल्याला स्वप्नं पडतात. ही स्वप्नं आपल्या लक्षात सुद्धा राहतात. बऱ्याच वेळा अध्यात्मिक दृष्ट्या आपली मानसिक अवस्था ही स्वप्न. दाखवत असतात.

आपण यापुढे हळूहळू एकेका गोष्टीचा सर्व विचार करू .आजकाल जे मोबाईलचे वेड लागलेले आहे ते झोपेसाठी अतिशय घातक आहे. त्यामुळे उत्तम झोप हवी असेल तर रात्री मोबाईल पाहणे टाळा.मोबाईलच्या स्क्रीनच्या नील किरणांमुळे आपण उत्तेजित होतो आणि त्यामुळे आपली चांगली झोप होत नाही. झोप येण्यासाठी उत्तेजना टाळली पाहिजे, आजूबाजूचा प्रकाश मंद असला पाहिजे. रात्री झोपेच्या आधी शक्यतो अर्धा तास तरी टीव्ही पाहू नका. त्यामुळे शांत झोपेला मदत होईल .यापुढे आपण या विषयावर अधिक चर्चा करून जी तुमच्या अतिशय उपयोगाची होणार आहे . धन्यवाद.

हा लेख आणि विषय आवडला असल्यास तो पुढे फॉरवर्ड करावा.

## जेवल्यानंतर पोटात तयार होतो गॅस, करा हे घरगुती उपाय



निरोगी राहण्यासाठी योग्य संतुलित आहार घेणे आवश्यक आहे, अशा परिस्थितीत आपल्या ताटात पोषक तत्वांनी समृद्ध असलेल्या गोष्टींचा समावेश करा. पण अनेक वेळा पौष्टिक अन्न खाल्ल्यानंतरही लोकांना पोटदुखी, फुगणे यांसारख्या समस्या होऊ लागतात. यामागे आपल्या जीवनशैलीतील काही चुका आहेत. घाईघाईत खाणे, अन्न नीट न चघळणे, जेवल्यानंतर लगेच आडवे होणे, झोपूनच खाणे अशा अनेक सवयी आहेत, ज्यामुळे पोटदुखी, गॅस, खाल्ल्यानंतर पोट फुगणे अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्हाला बाजारात अनेक औषधे मिळतील, परंतु काही घरगुती उपायांच्या मदतीने तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता.

पोटदुखी, जळजळ, ॲसिडिटी तुम्हाला त्रास देऊ शकते. अशा परिस्थितीत आम्ही तुम्हाला काही टिप्स सांगत आहोत ज्याच्या मदतीने तुम्ही या समस्येपासून मुक्त होऊ शकता. चला काही घरगुती उपायांबद्दल जाणून घेऊया ज्याच्या मदतीने तुम्ही अपचन, पोटदुखी, पोट फुगणे यासारख्या समस्यांपासून घरीच सुटका मिळवू शकता.

१. जिऱ्याचे पाणी प्या

गॅस आणि ॲसिडिटीच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही जिऱ्याचा वापर करू शकता. त्यामुळे तुमची पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. त्याचा वापर करून तुम्ही वजनही कमी करू शकता. हे करण्यासाठी, प्रथम एक ग्लास पाणी पूर्णपणे उकळवा, जेव्हा ते उकळते तेव्हा त्यात एक चमचा जिरे घाला. नंतर हे पाणी चांगले उकळवून घ्या. पाण्याचा रंग बदलला की ते गाळून त्यात काळे मीठ टाका.

२. पुदिन्याचे पाणी प्या

पोट फुगणे किंवा पोटदुखीच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी ४-५ पुदिन्याची पाने कुस्करून पाण्यात मिसळून प्या. यामुळे तुम्हाला पोटदुखीपासून आराम तर मिळेलच पण तुम्ही ताजेतवाने व्हाल.

३. बडीशेप पाणी प्या

पोटाची जळजळ कमी करण्यासाठी तुम्ही बडीशेपचे पाणी पिऊ शकता. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली राहते आणि थंडपणाही येतो. मासिक पाळीच्या दुखण्यापासून मुक्त होण्यासाठी तुम्ही बडीशेपच्या पाण्याचाही वापर करू शकता.

४. ओव्याचे पाणी

पोटदुखीच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ओव्याचे पाणी देखील वापरू शकता. यासाठी तुम्ही ओवा पाण्यात उकळून प्या. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यात काळे मीठही घालू शकता.

# थंडीत आरोग्याची काळजी घ्या, या ५ टिप्स वापरून पहा



या हिवाळ्यात या ५ आरोग्य टिप्स वापरून पहा: थंड हवामानाचा परिणाम होऊ लागला आहे. हिवाळा सर्दी आणि फ्लू, ब्राँकायटिस आणि दमा, सायनुसायटिस, कोरडी त्वचा, संधिवात, चिलब्लेन्स, हायपोथर्मिया, उच्च रक्तदाब आणि हृदयरोग अशा अनेक लोकांसाठी वाढता धोका घेऊन येतो. तर, थंडीपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी हे ५ घरगुती उपाय वापरून पहा.

हिवाळ्यात तूप घालून कॉफी पिण्याचे फायदे वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे

काही साधे प्रतिबंधात्मक उपाय:

१. उबदार कपडे आणि ब्लँकेट: तुमच्या शरीरावर दोन किंवा तीन थरांच्या कपड्यांचा वापर करा. उबदार कपडे घाला जे तुम्हाला उबदार ठेवतील. नेहमी आतील कपडे घाला. झोपताना सुती रजाई आणि लोकरीचे ब्लँकेट वापरा. तुमचे कान मफलर किंवा टोपीने झाका.

महानगरपालिका निवडणुकांचे निकाल महायुतीसाठी त्सुनामी ठरतील,आशिष शेलार यांचा दावा

२. शुद्ध, कोमट पाणी प्या: तुमच्या शरीराला हायड्रेटेड आणि उबदार ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. हे करण्यासाठी, नियमितपणे कोमट पाणी प्या. यामुळे शरीराचे तापमान देखील सामान्य राहील. तुमच्या पाण्याच्या शुद्धतेकडे विशेष लक्ष द्या.

हिवाळ्यात प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी या सवयी बदला

३. सूर्यप्रकाश घ्या: तुमच्या व्हिटॅमिन डीला वाढवण्यासाठी आणि नैसर्गिक उबदारपणा देण्यासाठी, रात्री १२:०० वाजण्यापूर्वी थोडा वेळ सूर्यप्रकाश घ्या. या सूर्यप्रकाशामुळे तुमच्या शरीरावर थंडीचा परिणाम कमी होण्यास मदत होईल आणि तुम्हाला सर्दी आणि फ्लूप-ासून दूर ठेवता येईल.

हिवाळ्यात आरोग्याची काळजी घ्यायची असेल तर या ५ गोष्टी खा

४. पौष्टिक आहार: आले, लसूण, आवळा, तुळस, हळद आणि च्यवनप्राश यासारखे पदार्थ खा. भाज्यांमध्ये पालक, मेथी, गाजर, मुळा, बथुआ, गोड बटाटे, फुलकोबी, ब्रोकोली आणि पेरू यांचा समावेश आहे. फळांमध्ये संत्री, सफरचंद, पेरू, किवी, पपई आणि नाशपाती यांचा समावेश आहे. बटाटे आणि भात यास-ारखे पदार्थ टाळा.

५. व्यायाम: नियमितपणे व्यायाम करा किंवा योगा करा. यामुळे तुमचे शरीर उबदार राहील.

अस्वीकरण: वेबदुनियावर औषध, आरोग्य टिप्स, योग, धर्म, ज्योतिष, इतिहास, पौराणिक कथा इत्यादी विषयांवर प्रकाशित/प्रसारित होणारे व्हिडिओ, लेख आणि बातम्या केवळ तुमच्या माहितीसाठी आहेत आणि विविध स्त्रोतांकडून घेतल्या आहेत. वेबदुनिया या माहितीच्या सत्यतेची पुष्टी करत नाही. आरोग्य किंवा ज्योतिषशास्त्राशी संबंधित कोणतेही प्रयोग करण्यापूर्वी नेहमीच तज्ञांचा सल्ला घ्या. ही सामग्री सार्वजनिक हितासाठी सादर केली गेली आहे आणि कोणत्याही वैज्ञानिक पुराव्यांद्वारे समर्थित नाही

# दूषित पाणी प्यायल्याने होऊ शकतात हे गंभीर आजार



आपल्या शरीरात सुमारे ७०% पाणी असते आणि आपल्या देशात, यातील सुमारे ७०% पाणी पिण्यायोग्य नसते; ते दूषित असते. आयुर्वेदानुसार, सर्वोत्तम पाणी म्हणजे पावसाचे पाणी. त्यानंतर हिमनदीने भरलेल्या नद्यांचे पाणी, नंतर तलावाचे पाणी, नंतर बोअरवेलचे पाणी आणि पाचवे म्हणजे विहीर किंवा टाकीचे पाणी. जर पाण्याची चव वाईट असेल तर ते उकळवा, गाळून घ्या आणि नंतर ते प्या. दूषित पाणी पिण्यामुळे ११ प्रकारचे आजार होतात.

-ङडज ठए-ऊ घाणेरडे पाणी कसे स्वच्छ करावे, जाणून घ्या ५ योग्य पद्धती

दूषित पाण्यामुळे होणारे ११ प्रमुख आजार:

१. कॉलरा: हा जीवाणूंमुळे होतो, त्यामुळे तीव्र अतिसार आणि उलट्या होतात आणि ते प्राणघातक ठरू शकते.

२. टायफॉइड: हा देखील बॅक्टेरियामुळे होतो आणि त्यामुळे जास्त ताप, पोटदुखी आणि अशक्तपणा येतो.

३. अतिसार: वारंवार सैल मल, पोटात पेटके आणि डिहायड्रेशन ही त्याची मुख्य लक्षणे आहेत.

४. आमांश: हा रक्त आणि श्लेष्मासह अतिसार आहे, जो जीवाणूंमुळे होतो (जसे की शिगेला).

५. हिपॅटायटीस ए आणि ई: हा एक विषाणू-जन्य संसर्ग आहे ज्यामुळे कावीळ, यकृताची जळजळ, थकवा आणि पोटदुखी होते.

६. पोलिओ: हा एक विषाणूजन्य आजार आहे, जो दूषित पाण्याद्वारे पसरतो आणि पक्षाघात होऊ शकतो.

७. अमिबियासिस: हा एका परजीवीमुळे होतो, ज्यामुळे पोटदुखी आणि अतिसार होतो.

८. गॅस्ट्रोएन्टेरिटिस: सामान्यतः हिंदीमध्ये गॅस्ट्रोएन्टेरिटिस म्हणून ओळखले जाते. बोलीभाषेत, याला पोटाचा संसर्ग, गॅस्ट्रोएन्टेरिटिस, आणि पोटाचा फ्लू असेही म्हणतात. हा दूषित पाण्यात आढळणाऱ्या नोरोव्हायरस किंवा रोटाव्हायरस बॅक्टेरियामुळे होतो.

९. जिआर्डियासिस: हा जिआर्डिया नावाच्या सूक्ष्म परजीवींमुळे होतो. लक्षणे म्हणजे पोटफुगी, गॅस, मळमळ आणि कृश/दुर्गंधीयुक्त अतिसार.

१०. जंतांचा संसर्ग: घाणेरड्या पाण्यात जंतांची अंडी (जसे की गोल जंत किंवा गिनी जंत) असू शकतात. ही अंडी पोटात उबतात आणि त्यांची संख्या वाढते, ज्यामुळे कुपोषण, अशक्तपणा आणि पोटदुखी यासारख्या समस्या उद्भवतात.

११. ई. कोलाय संसर्ग: या जीवाणूमुळे आतड्यांमध्ये गंभीर संसर्ग होतो. त्यामुळे पोटात तीव्र पेटके आणि रक्तरंजित अतिसार होऊ शकतो.

- हिवाळ्यात रोग प्रतिकारक शक्ती वाढवणारे या पदार्थांचे सेवन करा

दूषित पाणी प्यायल्यानंतर सामान्य लक्षणे: अतिसार आणि उलट्या, उच्च ताप आणि थकवा, पोटदुखी आणि पेटके, कोरडे तोंड आणि लघवी कमी होणे (निर्जलीकरण), डोळे आणि त्वचा पिवळी पडणे (कावीळ). यामुळे मूत्रपिंड आणि यकृताचे गंभीर नुकसान देखील होऊ शकते.

-ङडज ठए-ऊ थंडीत आरोग्याची काळजी घ्या, या ५ टिप्स वापरून पहा

अस्वीकरण: वेबदुनियावर औषध, आरोग्य टिप्स, योग, धर्म, ज्योतिष, इतिहास, पौराणिक कथा इत्यादी विषयांवर प्रकाशित/प्रसारित होणारे व्हिडिओ, लेख आणि बातम्या केवळ तुमच्या माहितीसाठी आहेत आणि विविध स्त्रोतांकडून घेतल्या आहेत. वेबदुनिया या माहितीच्या सत्यतेची पुष्टी करत नाही. आरोग्य किंवा ज्योतिषशास्त्राशी संबंधित कोणतेही प्रयोग करण्यापूर्वी नेहमीच तज्ञांचा सल्ला घ्या. ही सामग्री सार्वजनिक हितासाठी सादर केली गेली आहे आणि कोणत्याही वैज्ञानिक पुराव्यांद्वारे समर्थित नाही.

# ट्रम्प यांची गुंडगिरी



जगाला अणुयुद्धाची धमकी देणार्याकडे ट्रम्प यांच्यामुळे पाकिस्तानची सूत्रे गेली, त्याच दहशतवादी मानसिकतेच्या व्यक्तीकडे बांगला देश आहे. नेपाळमध्ये चीनला इश-ारा म्हणून सत्तांतर घडविण्यात आले. व्हेनेझुएलावरील हल्ला आणि अध्यक्षांना पळवून नेणे ही डोनाल्ड ट्रम्प यांची गुंडगिरी आहे. जागतिक व्यवस्था बदलायला निघालेला हा हुकुमशहा जगाला कोणत्या खाईत ढकलेल, हे सांगता येत नाही. अमली पदार्थांच्या व्यापाराचा ठपका ठेवत ट्रम्प यांनी व्हेनेझुएलावरील हल्ल्याचा पट आखला. हल्ल्याच्या दुसर्याच दिवशी तेथील तेलाच्या साठ्यांसाठी सर्व केले, अशी निलाजरी कबुली त्यांनी देऊन टाकली. अमेरिकेकडून हे प्रथमच झाले, असे अजिबात नाही! लोकशाहीचे ढोंग करणार्या अमेरिकेने इराकचे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना अतिशय क्रुर पद्धतीने संपवले. इराककडे घातक अशी रासायनिक अस्त्रे आहेत, असा कांगावा त्यावेळी केला गेला. प्रत्यक्षात जगाला धोका निर्माण होईल अशी कुठलीही अस्त्रे इराककडे नव्हती. लिबियाचे प्रमुख गडाफी, पनामाचे अध्यक्ष मॅन्युएल नॉरिएगा यांचाही अमेरिकेने शेवट केला. सौदी अरेबियाचे राजे फैजल यांची हत्या करण्यात आली. निष्पाप भारतीयांच्या रक्ताची चटक लागलेला पाकिस्तान आणि आपल्या व्यापारी हितासाठी कोणत्याही दे-शात नरसंहाराला तयार असलेली अमेरिका, यात मूलभूत फरक नाही. तात्त्विक मुलामा देऊन आतापर्यंत अमेरिकेची सीआयए जे करत होती ते डोनाल्ड ट्रम्प उघडपणे करत आहेत.

## जागतिक पोलिस

जागतिक संकेत, आंतरराष्ट्रीय कायदे याची ट्रम्प यांना चाड नाही आणि सुसंस्कृतपणापासून तर ते फारच दूर आहेत. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ट्रम्प यांनी अमेरिकेत पळवून नेणे ही तर सर्वांत तिरस्करणीय म्हणता येईल अशी कृती. ती करणार्या या महाशयांचे गोडवे अगदी काल-परवापर्यंत येथे गायले जात होते! आयात शुल्काचा दणका बसल्यावर अनेकजणांना वास्तव-ाची जाण आली. निकोलास माद-ुरो यांच्यावर अमेरिकेत खटला चालणार आहे. आरोप आधीच ठेवले गेले आहेत आणि शिक्षा काय द्यायची हेही आधी ठरले आहे. हा अधिकार अमेरिकेला कोणी दिला? जगातील सर्व देशांनी तसा ठराव केला आहे का? लोकशाही अथवा विचारस्वातंत्र्य यांच्या निर्देशांकांचे बनावट अहवाल पुढे करत भारतासह अनेक देशांना अमेरिकेतून जे जाब विचारण्याचे धाडस करतात त्यांची आता दातखिळी बसली असेल. एकच देश जागतिक महासत्ता असणे जगाच्या विनाशाला कारण ठरू शकते. रशियाचे सामर्थ्य कमी करण्यासाठी अमेरिकेने थंडपणे पावले उचलली. युक्रेन युद्धात रशियाला गुंतवून 'जागतिक पोलिस' ही आपली भूमिका अमेरिका अधिक जोरात बजावू लागली. भारताच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे आणण्यासाठी तर असंख्य प्रयोग सुरू आहेत. व्हेनेझुएलावरील हल्ल्याकडे चीनला वेसण घालण्याचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. तेलाचे प्रचंड भांडार आणि विपुल खनिज संपत्ती, हे व्हेनेझुएलाचे सामर्थ्य. पण चीन आणि अन्य देशांबरोबर तेलाचा व्यापार करताना व्हेनेझुएलाकडून डॉलरला महत्त्व दिले गेले नाही. डॉलरच्या आधारावर जागतिक अर्थकारण ताब्यात ठेवू पाहणार्या अमेरिकेला अर्थातच ते झोंबणारे होते. याशिवाय व्हेनेझुएलाकडून चीनला मिळणारे झुकते माप अमेरिकेला खटकणारे ठरले. अवघ्या तीन - साडेतीन तासांच्या कालावधीत अमेरिकेने व्हेनेझ-ुएलावर कब्जा मिळवला. तेथील संरक्षण यंत्रणा किती कुचकामी होती, हे जगाने पाहिले. पण ती यंत्रणा चीनची होती आणि चीनची शस्त्रे परिणामकारक नाहीत, याचाच अनेकांना आनंद झाला. एका शत्रूकडून दुसर्याची जिरली, हे स्वतःचे यश मानण्याची मानसिकताच विचित्र! त्याशिवाय, आता विशिष्ट भारतीय कंपन्यांना व्हेनेझुएला-तील तेलाची कंत्राटे मिळणार आहेत! ट्रम्प यांच्या गुंडगिरीचा निःसंदिग्ध शब्दात निषेध करणे भारताने टाळले. केवळ गंभीर चिंता भारताकडून व्यक्त झाली. हे अपेक्षित नव्ह-ते. अमेरिकेचा रोख ब्राझिल, चीन, रशिया आणि भारत यांच्याकडे आहे. ब्रिक्स देश आपसातील व्यापार डॉलरऐवजी आपापल्या चलनात करणे अमेरिकेला मानवणारे नाही. त्यामुळे व्हेनेझुएलानंतर सर्वांत आधी ब्राझिलला ट्रम्प यांच्या वेडाचाराचा सामना करावा लागणार, अशी शक्यता आहे. भारतालाही त्या दृष्टीने अधिक सावध राहावे लागणार आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



सगळ्याच स्त्रियांना योनीमार्गात ओलासर पणा जाणवतो. योन-ीतून झिरपणाऱ्या पाण्याला योनिस्राव किंवा पांढरे पाणी असे म्हण-तात. या पाण्यामुळे योनी स्वच्छ रा-हते. स्वाभाविक ओल किंवा पांढरे पाणी आतील कपडे खराब करत नाही. आतील कपडे खराब होतील इतक्या प्रमाणात जर पांढरे पाणी जात असेल तर मात्र चिंता करण्यासारखी गोष्ट असते.काही विशिष्ट परिस्थितीमध्ये नैसर्गिकरीत्या योनीतून थोडे जास्त पांढरे पाणी जाते. बीज बिजकोषातून बाहेर पडल्यावर (२४ ते २८ तास पाळीच्या मध्यावर), गरोदरपणी आणि लैंगिक संबंधाच्या वेळेस योनीतून पांढरे पाणी जास्त प्रमाणात जाऊन कपडे खराब होऊ

## २ Joke विनोद






झंम्प्या : साहेब
ह्यावेळी तुम्ही माझ्या पगारात २०० रुपये कमी दिलेत
साहेब : अरे वा गेल्यावेळी तुला पगारात चुकून २०० रुपये जास्त दिले होते..
झंम्प्या : हो साहेब पण ती तुमची पहिलीच चुक होती म्हणून मी तेव्हा गप्प होतो...

## ३ Message संदेश



Internet Per Ladki Pataai,
Internet Per Ho Gai Sagaai,
Internet Per Hi Divorce Ho Gaya,
Isi Bahany Computer Ka Course Ho Gaya..

## ४ Thought सुविचार

शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.- कार्लाइल




**संस्कृत सुभाषित**

आयुः सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः।
रस्याः ास्निग्धाः ास्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### ट्रॅव्हिस हेड ठरला 'हा' विक्रम करणारा केवळ पाचवा खेळाडू

मुंबई -ॲशेस मालिकेतल्या सिडनी कसोटीत ट्रॅव्हिस हेडने शतकी खेळी साकारत एका दुर्मीळ विक्रमाला गवसणी घातली. हेडचं ऑस्ट्रेलियासाठीचं हे १२वं तर या मालिकेतलं तिसरी शतकी खेळी आहे. जोश टंगच्या गोलंदाजीवर चौकार खेचत हेडने शतक पूर्ण केलं. अवघ्या १०५ चेंडूत हेडने शतकी टप्पा गाठला. या शतकासह ऑस्ट्रेलियातल्या सात विविध मैदानांवर कसोटी शतक झळकावणारा हेड हा केवळ पाचवा खेळाडू ठरला आहे. शतकासह हेड, स्टीव वॉ, जस्टीन लँगर, मॅथ्यू हेडन, डेव्हिड वॉर्नर यांच्या मांदियाळीत जाऊन पोहोचला आहे.२०१८ मध्ये हेडने दुबईत ऑस्ट्रेलियासाठी पदार्पण केलं. ६५वी कसोटी खेळणाऱ्या हेडने ॲडलेड ओव्हल मैदानात चार सामन्यात चार शतकं झळकावली. ब्रिस्बेनमधल्या गाबाच्या मैदानावर हेडच्या नावावर दोन शतकं आहेत. कॅनबेरातलं मनुका ओव्हल, होबार्टमधलं बेलराईल ओव्हल, पर्थमधील ऑप्टस स्टेडियम, मेलबर्न क्रिकेट ग्राऊंड आणि सिडनी क्रिकेट ग्राऊंड अशा मैदानांवर प्रत्येकी एक शतक हेडच्या नावावर आहे.

### टीम इंडियाच्या माजी क्रिकेटरच्या घरी नव्या पाहुण्याचे आगमन, तिसऱ्यांदा झाला बाबा

दिल्ली-वर्षाच्या सुरुवातीलाच टीम इंडियाचा माजी क्रिकेटर अंबाती रायडू आणि पत्नी चेन्नुपल्ली विद्या यांच्या घरी नव्या पाहुण्याचं आगमन झालंय. सोमवारी अंबातीने त्याच्या इंस्टाग्रामवर चिमुकल्या सोबतचा फोटो शेअर करून आपल्या फॅन्स आणि फॉलोअर्स सोबत आनंदाची बातमी शेअर केली. त्यांने रुग्णालयातील एक फोटो शेअर केला ज्यात त्याची पत्नी ही नवजात बाळासोबत दिसतेय. अंबाती रायडू हा तिसऱ्यांदा बाबा बनला असून त्याला आधी दोन मुली आहेत. अंबाती रायडू आणि चेन्नुपल्लीने फेब्रुवारी २००९ रोजी विवाह केला.

अंबाती रायडूने फोटोवर कॅप्शन लिहीत म्हटले, 'मुलगा झाल्याचा आनंद आहे...'. अंबाती रायडूने पोस्ट शेअर केल्यावर संपूर्ण क्रिकेट जगतातून त्याच्यावर शुभेंच्छाचा वर्षाव करण्यात आला. माजी क्रिकेटर शिखर धवनने लिहिले की, 'अभिनंदन भाऊ'. तर हरभजन सिंहने कमेंट करून 'अभिनंद रायडू' असे म्हटले.

### टीम इंडियाच्या क्रिकेटरची नागरिकता धोक्यात?

दिल्ली-भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी हा मूळचा उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील आहे. पण क्रिकेटच्या कारकीर्दीसाठी तो लहानपणापासूनच कोलकात्यात राहतो. बंगालच्या रणजी संघासाठी खेळण्यासाठी त्याने कोलकात्यात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. आता तो कोलकाता महानगरपालिकेच्या वार्ड क्रमांक ९३ मध्ये मतदार म्हणून नोंदणीकृत आहे. जो रासबिहारी विधानसभा मतदारसंघात येतो. अनेक वर्षापासून तो बंगालचा रहिवासी मानला जातो. दरम्यान शमीच्या नागरिकतेवर प्रश्न उपस्थित होतोय.

**का पाठवली नोटीस?**

पश्चिम बंगालमध्ये मतदार यादी सुधारण्यासाठी निवडणूक आयोगाने स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन (एघीं) म्हणजे विशेष गहन पुनरावलोकन मोहीम सुरू केलीय. या मोहिमेत मतदारांच्या नोंदणी फॉर्ममध्ये तांत्रिक चुका शोधल्या जातात. शमी आणि त्याच्या भावाच्या मोहम्मद कैफ यांच्या फॉर्ममध्ये 'प्रोजेनी मॅपिंग' आणि 'सेल्फ मॅपिंग'शी संबंधित काही त्रुटी आढळल्या.

### रोहितच्या जागेवर २० वर्षांच्या सोलापूरकराचा दावा!

मुंबई-रोहित शर्मांने टेस्ट आणि टी-२० आंतरराष्ट्रीयमधून निवृत्ती घेतली आहे, त्यामुळे तो आता फक्त वनडे क्रिकेट खेळत आहे. रोहित शर्मा पुढच्या वर्षी होणाऱ्या वनडे वर्ल्ड कपपर्यंत खेळेल, असं बोललं जात आहे, पण त्यानंतर टीम इंडियामध्ये रोहित शर्माची जागा कोण घेणार? याबाबत मागच्या काही काळापासून चर्चा सुरू आहेत. ऋतुराज गायकवाड, यशस्वी जयस्वाल आणि आयुष म्हात्रे या खेळाडूंची नावं यात पुढे येत आहेत, पण विजय हजारे ट्रॉफीमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूने दमदार कामगिरी करून रोहित शर्माच्या जागेवर दावा ठोकला आहे.

महाराष्ट्राचा ऑलराऊंडर अर्शीन कुलकर्णी हा सातत्याने चांगली कामगिरी करत आहे. छत्तीसगडविरुद्धच्या सामन्यात अर्शीनने ६७ रनची खेळी केली. त्याआधी मुंबईविरुद्धच्या सामन्यात अर्शीनने ११४ बॉल ११४ रन केले आणि त्यानंतर त्याने ३ बॉलमध्ये एक विकेटही घेतली.

# मुस्तफिजूर रहमानसाठी संपूर्ण बांगलादेश वेठीला!

## आयपीएल प्रसारणावरील बंदीमुळे क्रिकेटप्रेमींमध्ये संताप

नवी दिल्ली : बीसीसीआयने अलीकडेच आयपीएल फ्रँचायझी कोलकाता नाईट रायडर्सला बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमान याला संघातून मुक्त करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर लगेचच केकेआरने मुस्तफिझूरला आपल्या संघातून बाहेर काढले. या निर्णयामुळे बांगलादेशमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, आता त्यांनी मोठे पाऊल उचलले आहे.

बांगलादेश सरकारने जगातील सर्वात लोकप्रिय क्रिकेट लीग इंडियन प्रीमियर लीगच्या प्रसारणावर अनिश्चित काळासाठी बंदी घातली आहे. या निर्णयामुळे बांगलादेशमधील आयपीएलप्रेमी क्रिकेट चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, गेल्या महिन्यात अबूधाबी येथे झालेल्या मिनी ऑक्शनमध्ये केकेआरने मुस्तफिझूर रहमानला ९.२० कोटी रुपयांना विकत घेतले होते. बांगलादेशच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने ५ जानेवारी रोजी देशातील सर्व टेलिव्हिजन चॅनल्सना आयपीएलचे प्रसारण तत्काळ थांबवण्याचे आदेश दिले. हा आदेश अधिकृत पत्राद्वारे देण्यात आला आहे.

या पत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, बीसीसीआयने कोणतेही ठोस कारण न देता बांगलादेशचा स्टार खेळाडू मुस्तफिझूर रहमान याला आगामी आयपीएल हंगामातून बाहेर काढल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकारामुळे बांगलादेशच्या जनतेमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढील आदेश येईपर्यंत आयपीएलचे सर्व सामने आणि संबंधित कार्यक्रमांचे प्रसारण त्वरित बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.भारतात जाणार नाही बांगलादेश संघ-यापूर्वीच बांगलादेशने टी-२० विश्वचषक २०२६ साठी भारतात न जाण्याचा अधिकृत





निर्णय घेतला आहे. यामुळे दोन्ही देशांतील संबंध आणखी ताणले गेले आहेत. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आयसीसीकडे पत्र लिहून बांगलादेशचे सर्व सामने भारताऐवजी श्रीलंकेत हलवण्याची मागणी केली आहे. सध्या नियोजनानुसार, बांगलादेशचे पहिल्या तीन लीग सामने कोलकात्यात तर चौथा सामना मुंबईत होणार आहे.

राजकीय तणावही कारणीभूत

उल्लेखनीय बाब म्हणजे, बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना सत्तेवरून हटवण्यात आल्यानंतर दोन्ही देशांतील संबंध अधिकच तणावपूर्ण झाले आहेत. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये सरकारविरोधी आंदोलनांनंतर शेख हसीना भारतात आल्या होत्या. त्यानंतर बांगलादेशमध्ये भारतविरोधी भावना आणि आंदोलनांना उधाण आले आहे.

# युवा भारताचा द. आफ्रिकेवर विजय

**बेनोनी :** पावसाच्या व्यत्ययामुळे डकवर्थ-लुईस-स्टर्न पद्धतीचा वापर करून लावण्यात आलेल्या निकालात, भारतीय १९ वर्षांखालील युवा संघाने यजमान दक्षिण आफ्रिकेचा २५ धावांनी पराभव केला आहे. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या युवा वन-डे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.



भारताने सुरुवातीच्या पडझडीतून सावरत ५० षटकांत सर्वबाद ३०० धावांचा डोंगर उभा केला. हरवंश पंगालियाने (९३ धावा) आणि आर. एस. अंबरीशने (६५ धावा) केलेल्या महत्त्वपूर्ण भागीदारीमुळे भारताला हा आव्हानात्मक स्कोअर करता आला. ३०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेनेही चांगली सुरुवात केली. जोरिच व्हॅन शॉकविक (नाबाद ६० धावा) आणि अरमान मनॅक (४६ धावा) यांनी डाव सावरला. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली. सलामीवीर साहिलने डावाची सकारात्मक सुरुवात केली, मात्र तो ३२ धावांवर बाद झाला. तसेच अभिषेकने उपयुक्त २८ धावांचे योगदान देऊन मधल्या फळीत हरवंशला साथ दिली. मधल्या फळीत फलंदाजीला आलेल्या हरवंश पंगालियाने ९३ धावांची वादळी खेळी केली. त्याचे शतक अवघ्या ७ धावांनी हुकले असले, तरी त्याच्या या खेळीने भारताला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. त्याला आर. एस. अंबरीशने ६५ धावांचे मोलाचे योगदान देऊन उत्तम साथ दिली. दक्षिण आफ्रिकेकडून जे. जे. बॅसन आपल्या यशस्वी गोलंदाजीने १० षटकांत ४ बळी टिपले आणि भारतीय धावगतीवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला. भारतीय डावाच्या अखेरीस विजांच्या कडकडाटामुळे खेळ काही काळ थांबवण्यात आला होता, मात्र सुदैवाने षटकांची कपात करण्यात आली नाही. विश्वचषकापूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या खेळपट्ट्यांवर भारतीय युवा खेळाडूंनी दाखवलेला हा आत्मविश्वास भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी आनंदाची बाब आहे.

आता भारताचे गोलंदाज या धावसंख्येचा बचाव करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अखेरचे वृत्त हाती आले तेव्हा दक्षिण आफ्रिकेचा संघ या ३०१ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी प्रयत्नशील होता. हा सामना अत्यंत चुरशीच्या वळणावर असून भारतीय गोलंदाजांना ठराविक अंतराने बळी मिळवावे लागणार आहेत.

# भारतीय महिला संघाने घेतले बाबा महाकाल दर्शन



मुंबई-२०२५ च्या अखेरीस धमाका करणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या स्टार खेळाडूंनी नवीन वर्षाच्या सुरुवातीला बाबा महाकालचे दर्शन घेतले आहे. उज्जैन येथील जगप्रसिद्ध महाकालेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात भारतीय महिला संघातील हरमनप्रीत कौर, स्मृती मानधना, शेफाली वर्मा, रेणुका सिंह ठाकुर, स्नेह राणा, राधा यादव आणि अरुंधती रेड्डी यांनी सकाळच्या विशेष भस्म आरतीत सहभाग घेतला. भल्या पहाटे विश्वविजेत्या महिला संघाला पाहून भाविकांनाही आनंद झाला. अनेकांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गतवर्षात दक्षिण आफ्रिकेला त्यांच्याच धावपट्टीवर हरवून भारतीय संघ विश्वविजेता ठरला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील महिला क्रिकेट संघाला गतवर्ष विजयाचे ठरले आहे. भारताच्या वाघीणींनी वेस्टइंडीजला २-१ आणि इंग्लंडला ३-२ अशी मात दिली. तर श्रीलंकेसोबत टी२० मालिकेत ५-० कामगिरी करत उत्कृष्ट खेळी केली. तिरुअनंतपुरममध्ये खेळताना अखेरच्या सामन्यात भारताने श्रीलंकेवर १५ धावांनी विजय मिळवला. यामुळे तिसऱ्यांदा टी२० आंतरराष्ट्रीय मालिकेत श्रीलंकेचा दारूण पराभव झाला. भारताच्या या खेळीमुळे भारताचा महिला क्रिकेट संघ सध्या जगभरात चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.

# राजस्थानने ३० लाखात घेतलेला फलंदाज चमकला! अमन राव पेरालाचे दमदार द्विशतक





मुंबई-विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील सहाव्या हंगामात आतापर्यंत युवा खेळाडूंचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. या स्पर्धेत मंगळवारी (६ डिसेंबर) झालेल्या सामन्यात बंगाल आणि हैदराबाद हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात हैदराबादचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. हैदराबादकडून फलंदाजी करताना २१ वर्षांच्या अमन राव पेरालाने धावांचा पाऊस पाडला. अमनने १५४ चेंडूंचा सामना करत वादळी द्विशतकी खेळी केली. या दमदार खेळीच्या बळावर हैदराबादने पहिल्या डावात फलंदाजी करताना ३५० हून अधिक धावांचा डोंगर उभारला.अमन राव पेरालाची दमदार द्विशतकी खेळी

अमन राव पेराला हैदराबादचा सलामीवीर फलंदाज आहे. प्रथम फलंदाजी करताना तो राहुल सिंगसोबत डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानात आला. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी १०४ धावांची भागीदारी केली. या डावात फलंदाजी करताना त्याने डावाच्या सुरूवातीपासूनच हल्लाबोल केला. या द्विशतकी खेळीदरम्यान त्याने एकूण १२ चौकार आणि १३ गगनचुंबी षटकार मारले. यादरम्यान त्याने १२९.८७ च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. त्याने या डावात चौकार आणि षटकारांच्या साहाय्याने १२६ धावा चोपल्या.

**आयपीएल २०२६ गाजवणार**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये हैदराबादकडून खेळणारा अमन राव पेराला हा आगामी आयपीएल २०२६ स्पर्धेत राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळताना दिसणार आहे. काही दिवसांपूर्वीच झालेल्या आयपीएलच्या मिनी लिलावात राजस्थान रॉयल्सने त्याला ३० लाखांची बोली लावून आपल्या संघात स्थान दिलं होतं. राजस्थान रॉयल्सला कमी किमतीत स्फोटक फलंदाज मिळाला आहे. पण राजस्थान रॉयल्स त्याला प्लेईंग ११ मध्ये खेळण्याची संधी देणार की नाही, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.अमन राव पेरालासह हैदराबादचा सलामीवीर फलंदाज राहुल सिंगने ५४ चेंडूंचा सामना करत ६५ धावांची खेळी केली. तर स्टार फलंदाज तिलक वर्माने ३४ धावांची खेळी केली. तर प्रागणाय रेड्डीने २२ धावा केल्या. अमन राव पेरालाने या डावात षटकार मारून आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील पहिलं द्विशतक झळकावलं. मुख्य बाब म्हणजे, त्याने हे द्विशतक बंगालच्या अनुभवी गोलंदाजांविरुद्ध खेळताना झळकावलं आहे.

# न्यूझीलंड विरूद्धच्या वन डे सीरिजसाठी भारतीय संघाची घोषणा

मुंबई : बीसीसीआयच्या निवड समितीने न्यूझीलंड विरूद्धच्या वन डे सीरिजसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन वन डे मॅचची सीरिज होणार आहे. यातील पहिला सामना ११ जानेवारी रोजी होणार आहे. यानंतर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पाच सामन्यांची टी ट्वेंटी मालिका होणार आहे. निवड समितीने टी ट्वेंटी मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा आधीच केली आहे. वन डे सीरिजसाठीच्या टीमची घोषणा आज म्हणजेच शनिवार ३ जनेवारी २०२६ रोजी करण्यात आली.

न्यूझीलंड विरूद्धच्या वन डे सीरिजसाठी शुभमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. श्रेयस अय्यर उपकर्णधारपदाची जबाबदारी हाताळणार आहे. केएल राहुल आणि रिषभ पंत यांचा संघात यष्टीरक्षक फलंदाज म्हणून समावेश करण्यात आला आहे. मानेच्या दुखापतीतून सावरल्यामुळे गिलचे संघात पुनरागमन झाले आहे.





वेगवान गोलंदाज सिराज आणि उपकर्णधार श्रेयस अय्यर यांचेही संघात पुनरागमन झाले आहे. पण श्रेयस अय्यरला फिटनेस टेस्ट पास केल्यानंतरच खेळण्याची संधी मिळणार आहे. श्रेयसला ऑस्ट्रेलिया दौऱ्यात झालेल्या दुखापतीमुळे काही काळ उपचार घ्यावे लागले आणि क्रिकेटपासून लांब राहावे लागले. सिराजचे पुनरागमन झाले तरी मोहम्मद शमीला संघात स्थान मिळालेले नाही. तो आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीत भारताकडून शेवटचा सामना खेळला होता. चॅम्पियन्स ट्रॉफीत भारताने न्यूझीलंडचा पराभव करुन स्पर्धा जिंकली होती.

**न्यूझीलंड विरूद्धच्या वन डे सीरिजसाठी भारतीय संघाची घोषणा :**

शुभमन गिल, कर्णधार; रोहित शर्मा; विराट कोहली; केएल राहुल, यष्टीरक्षक; वॉशिंग्टन सुंदर, उपकर्णधार; रविंद्र जडेजा; मोहम्मद सिराज; हर्षित राणा; प्रसिद्ध कृष्णा; कुलदीप यादव; रिषभ पंत, यष्टीरक्षक; नितीश कुमार रेड्डी; अर्शदीप सिंह; यशस्वी जयस्वाल

# आश्चर्यकारक! एकदिवसीय सामन्याची तिकीटं आठ मिनिटांत फूल, विराट अन् रोहितची क्रेझ





मुंबई: भारतातील क्रिकेट विश्व सध्या चर्चेत आहे. केवळ पुरुष नाही तर भारतीय महिला संघाचेसुद्धा सर्वत्र कौतुक सुरू आहे. दरम्यान एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका जानेवारीपासून होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना ११ जानेवारीला बडोद्यामध्ये खेळला जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघातून रोहित शर्मा आणि विराट कोहली खेळण्यास सज्ज झाले आहेत. देशांतर्गत विजय हजारे ट्रॉफीत दोघांनी आपला फॉर्म काय आहे तो दाखवून दिल्यानंतर चाहत्यांमध्ये त्यांची क्रेझ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा पुरावा म्हणजे ११ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या मालिकेतील पहिल्या सामन्यासाठी तिकीट खिडकी खुली झाली आणि अवघ्या ८ मिनिटात तिकीटं विकली गेली. तिकीट विक्रीच्या या वेगामुळे रोहीत आणि विराटची फलंदाजी पाहण्यासाठी क्रीडाप्रेमींमधील क्रेझ दिसून येते. महत्त्वाचे म्हणजे विराट कोहली आणि रोहित शर्मा त्यांच्या क्रिकेट करिअरच्या शेवटच्या टप्प्यात आहेत. तसेच त्यांच्यासाठी हे वर्ष खूपच महत्त्वाचे आहे. कारण पुढच्या वर्षी वनडे वर्ल्डकप स्पर्धा होणार आहे. त्याच्या तयारीसाठी या दोघांना या वर्षात खूपच मेहनत घ्यावी लागणार आहे. कारण या दोघांना वनडे वर्ल्डकप २०२७ मध्ये खेळण्याची इच्छा आहे. पण त्यासाठी फॉर्मही तितकाच महत्त्वाचा आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी टी२० आणि कसोटी संघातून निवृत्ती घेतली आहे. पण आता ते फक्त वनडे फॉर्मेटमध्ये खेळत आहे. त्यांच्या फलंदाजीची धार अजूनही कायम आहे. दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेत त्यांनी क्रीडाप्रेमींचे चांगलेच मनोरंजन केले. आता न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेतही तशीच अपेक्षा आहे. विराट कोहलीने दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेतील दोन सामन्यात शतक आणि तिसऱ्या सामन्यात अर्धशतकी खेळी केली होती. तर रोहित शर्माची बॅटही चांगलीच तळपली होती. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातही या दोघांच्या फलंदाजीची जादू दिसली होती. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका ११ जानेवारीपासून होत आहे. या मालिकेतील पहिला सामना बडोद्याच्या बीसीए स्टेडियममध्ये होणार आहे. तर दुसरा सामना १४ जानेवारीला राजकोटमध्ये आणि तिसरा सामना इंदूरमध्ये होलकर मैदानात होणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघात कोण खेळाडू असणार याची घोषणा २ किंवा ३ जानेवारी होणार आहे.

## ‘‘हिंद-दी-चादर’’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त

# आरंभता की अरदास कार्यक्रम नांदेड येथे पार पडला

## ‘‘हिंद-दी-चादर’’ कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो लोकांपर्यंत गौरवशाली इतिहास पोहचणार

**नांदेड/प्रतिनिधी :** ‘‘हिंद-दी-चादर’’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित उपक्रमाचा ‘आरंभता की अरदास’ हा विधी आज नांदेड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी मुख्य कार्यक्रमाच्या मंडपाचे भूमीपूजन तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वाराचे पंचप्यारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकि, भगत नामदेव संप्रदाय व उदासीन संप्रदाय या समाजातील संतांची उपस्थिती लाभली होती.

‘‘हिंद-दी-चादर’’ कार्यक्रमाचा औपचारिक प्रारंभ तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा अबचलनगर नांदेडचे मुख्य जथ्थेदार संत बाबा कुलवंत सिंगजी यांच्यासह भाई जोसिंदर सिंगजी, भाई राम



सिंगजी, भाई कश्मीर सिंगजी, भाई गुरमीत सिंगजी तसेच गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदर सिंगजी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी विधान परिषदेचे सदस्य बाबुसिंग महाराज (पोहरादेवी), जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, तहसीलदार संजय वारकड, ३५० वा शहीदी समागम समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, महंत सुनिल महाराज, महंत जितेंद्र महाराज, क्षेत्रीय समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, सरजीत सिंग गिल, क्षेत्रीय समितीचे पदाधिकारी, राज्यस्तरीय समितीचे सदस्य उपस्थित होते.

समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी होणाऱ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहादतीचा गौरवशाली इतिहास समाजासमोर मांडण्यात येणार आहे. अल्पसंख्यांक विकास विभाग आणि नऊ समाजांच्या संयुक्त सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, यापूर्वी ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे हा कार्यक्रम भव्य स्वरूपात संपन्न झाला आहे. त्याच धर्तीवर नांदेडमध्येही हा ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतरही श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा इतिहास जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग यांनी राज्यात नागपूर येथे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून नांदेड व नवी मुंबई येथेही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याबद्दल शासनाचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाचे स्मरण करण्यात येणार असून गौरवशाली इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, रविवार २५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मुख्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक नियोजन व पूर्वतयारीला गती देण्यात आली आहे. सुरक्षा, वाहतूक व कार्यक्रमस्थळ व्यवस्थापनाबाबत सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या असून यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे समन्वयक रामेश्वर नाईक, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शासकीय समितीतील अधिकाऱ्यांना सोपविलेल्या कामाचा आढावा घेतला.

## लातूर जिल्ह्यासाठी तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यासाठी २०२६ मधील तीन स्थानिक सुट्ट्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी ०५ जानेवारी, २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार जाहीर केल्या आहेत. यानुसार २८ ऑगस्ट २०२६ (शुक्रवार) रोजी रक्षाबंधन, १८ सप्टेंबर २०२६ (शुक्रवार) रोजी ज्येष्ठागौरी पूजन, ६ नोव्हेंबर २०२६ (शुक्रवार) रोजी धनत्रयोदशी निमित्त लातूर जिल्ह्यात स्थानिक सुट्टी राहणार आहे.

जिल्ह्यातील उच्च न्यायालयाच्या अधिकार कक्षेतील कार्यालये, केंद्रीय कार्यालये, केंद्रीय प्रशासनातील कार्यालये व बँकेच्या कक्षातील कार्यालये वगळता लातूर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषदेच्या कक्षेतील कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये, जिल्ह्यातील कोषागारे, महामंडळाची कार्यालये व इतर सर्व खाजगी शैक्षणिक संस्था यांना या तिन्ही सुट्ट्या लागू राहतील.

## नाशिक रोड येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात सीडीएस परीक्षा तयारीसाठी तज्ज्ञ शिक्षकांच्या तात्पुरत्या नियुक्त्या; ९ जानेवारीला मुलाखत

**लातूर/प्रतिनिधी :** युपीएससीमार्फत होणाऱ्या कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएस) २०२६ च्या तयारीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे तज्ज्ञ शिक्षकांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे. या शिक्षकांना प्रति तास रुपये ३०० असे मानधन दिले जाणार आहे. तरी पात्र प्राध्यापकांनी ९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता मुलाखतीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नाशिक रोड, नाशिक येथे उपस्थित राहावे.

प्रशिक्षणाचा कालावधी सीडीएस-६६ कोर्ससाठी १९ जानेवारी २०२६ ते ३ एप्रिल २०२६ आणि सीडीएस-६७ कोर्ससाठी १५ जून २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६ असा दोन टप्प्यात राहील. इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान- (सामान्यज्ञान, भूगोल, इतिहास, भारतीय राजकारण) आणि सामान्य विज्ञान- (अर्थशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) या विषयांसाठी तज्ज्ञ शिक्षकांची आवश्यकता आहे. यासाठी संबंधित अभ्यासक्रमाशी निगडित पदवीधर किंवा पदव्युत्तर असणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत कमीत कमी दोन वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

अधिक माहितीसाठी केंद्राचे प्रभारी अधिकारी ले. कर्नल विलास शंकर सोनवणे (नि.) यांच्या कार्यालयाशी भ्रमणध्वनी क्रमांक ९१५६०७३३०६ किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## दयानंद कला महाविद्यालयात नशामुक्ती जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** समाजात विशेषतः युवकांमध्ये वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेच्या समस्येला आळा घालण्यासाठी पोलीस विभागाच्या वतीने दयानंद कला महाविद्यालयात नशामुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जागरूक करणे व त्यांना नशामुक्त जीवनशैलीकडे प्रवृत्त करणे हा होता.

कार्यक्रमात अफू, चरस, गांजा तसेच इतर अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. व्यसनाधीनतेमुळे युवकांचे शैक्षणिक, कौटुंबिक व सामाजिक आयुष्य कसे उद्ध्वस्त होते, तसेच अशा व्यसनांमधून चोरी, मारहाण, गंभीर गुन्हे कसे उद्भवतात, यावर पोलीस अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे प्रबोधन केले.

या प्रसंगी पोलीस विभागातील अधिकारी श्री. पोलीस हवालदार राजेश्वर कांदे,पोलीस अंमलदार सुजित सुनील बेंबळे,पोलिसामुलदार एकनाथ डंबाळे सर्व नेमणूक आमली पदार्थविरोधी टास्क फोर्स नांदेड रेंज दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. संदीपन जगदाळे तसेच इतर मान्यवर मंचावर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर , सुदृढ विचारसरणी विकसित करण्याचे आणि सकारात्मक जीवनमूल्ये स्वीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या शंका मांडल्या असून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले. नशामुक्त भारत घडवण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रा दिनेश जोशी,प्रा जिगाजी बुद्रुके, प्रा सुरेश क्षीरसागर, प्रा विलास कोमटवाड, प्रा दशरथ ननवरे डॉ.सुधीर गाडवे, प्रा महेश जंगापल्ले, प्रा रत्नाकर केंद्रे कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारीवर्गाने मोलाचे सहकार्य केले.

## आता तपोवन नाही तर नाशिक जिल्ह्यातील एकही झाड तोडू नका; हरित लवादाचे आदेश

**नाशिक/प्रतिनिधी:** वाडीवरे येथील वृक्षतोडीवरून हरित लवादानं नाशिक जिल्हा प्रशासनाला धक्का देत संपूर्ण जिल्ह्यात वृक्षतोडीस स्थगितीचे आदेश दिले आहेत. नाशिक जिल्हा प्रशासनाला ॲड. श्रीराम पिंगळे यांनी हरित लवादाच्या माध्यमातून आणखी एक धक्का दिला आहे. संपूर्ण नाशिक जिल्ह्यात वृक्षतोडीस आज अंतरिम स्थगिती देण्यात आली आहे. तपोवनातील वृक्षतोडीचा मुद्दा चर्चेत असताना आता नाशिक जिल्ह्यातील वाडीवरे ते समृद्धी महामार्गावर डिसेंबर महिन्यात २०० वर्ष जुन्या वडाच्या झाडांची कत्तल सुरू असल्याची माहिती पर्यावरणप्रेमी अर्जदार अश्विनी भट यांना समजली. त्यांनी तातडीने त्या ठिकाणी जाऊन बेकायदा वृक्षतोड थांबवण्याचा प्रयत्न केला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वृक्षतोड करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वृक्ष तोडण्यासाठी परवानगी दाखवा, असं विचारलं असता त्यांनी १९ ऑगस्ट रोजीचे अपघातग्रस्त वृक्ष व फांद्या तोडीस फक्त ३० दिवसांची मुदतवाढ देणारं पत्र दाखवलं. सदरचं पत्र १८ सप्टेंबर रोजी कालबाह्य झालं असल्यानं १९ डिसेंबर रोजी त्यांना वृक्ष तोडण्याचा अधिकार नव्हता, असं लक्षात आणून दिलं. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी तिथून पळ काढला होता. यानंतर पर्यवरणप्रेमी आश्विनी भट यांनी ॲड. श्रीराम पिंगळे यांच्या माध्यमातून हरित लवादामध्ये याचिका दाखल केली होती. त्या संदर्भात आता हरित लवादानं निकाल देत नाशिक जिल्ह्यातील एकही झाड कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय तोडता येणार नाही, असं म्हणत १२ मार्च पर्यंत नाशिक जिल्ह्यातील झाडे तोडण्यास स्थगिती दिली आहे.

## ‘सेवा हक्क कायद्या’ अंतर्गत महसूलच्या २० सेवा ऑनलाईन; लाभ घेण्यासाठी नागरिकांना ‘आपले सरकार’ पोर्टलद्वारे करता येणार अर्ज

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय सेवा नागरिकांना ठराविक कालमर्यादेत आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग कार्यरत आहे.

नागरिक आता ‘आरटीएस महाराष्ट्र’ मोबाईल ॲप किंवा ‘आपले सरकार’ वेब पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध सेवांची माहिती पाहू शकतात आणि ऑनलाइन अर्जही करू शकतात. सेवा देण्यात विलंब झाल्यास किंवा नाकारल्यास प्रथम व द्वितीय अपील संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तर तृतीय अपील आयोगाकडे करता येते. महसूल विभागांतर्गत उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र आदी एकूण २० अधिसूचित सेवा या कायद्यांतर्गत उपलब्ध आहेत. या सेवा १ ते २१ दिवसांच्या कालमर्यादेत पूर्ण केल्या जातात. नागरिकांनी ‘आपले सरकार’ पोर्टलवर लॉग-इन करून सेवा निवडणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज सादर करणे अपेक्षित आहे.

अर्ज सादर झाल्यानंतर मिळणाऱ्या एसीके क्रमांकाच्या आधारे अर्जाची स्थिती ऑनलाइन ट्रॅक करता येते. छाननी व पडताळणीनंतर मंजूर प्रमाणपत्र थेट ऑनलाइन उपलब्ध करून दिले जाते. ऑनलाइन अर्ज करणे शक्य नसलेल्या नागरिकांसाठी ‘आपले सरकार सेवा केंद्रां’मार्फतही ही सुविधा उपलब्ध आहे. या केंद्रांद्वारेही सर्व सेवा ऑनलाइन पद्धतीनेच दिल्या जातात. यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचत असून शासकीय सेवा अधिक सुलभ आणि पारदर्शक झाल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी ‘आरटीएस महाराष्ट्र’ आणि ‘आपले सरकार’ पोर्टलचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व दलालांपासून दूर राहून अधिकृत मार्गाने अर्ज करावेत, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

## मतदान करा, लोकशाही बळकट करा’; लातूर शहरात ’वॉकेथॉन’ला उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्र्वभूमीवर, मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आज शहरात भव्य ’वॉकेथॉन’ रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. लातूर शहर महानगरपालिका आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या रॅलीत हजारो लातूरकरांनी सहभाग नोंदवत ’मतदान हा आपला हक्क’ असल्याचा संदेश दिला.

जिल्हा क्रीडा संकुल ते टाऊन हॉल घुमला घोषणांचा आवाज

सोमवारी सकाळी ७:०० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथून या वॉकेथॉनला महानगरपालिकेचे अति. आयुक्त मा. श्री. देविदास जाधव सर यांनी हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. यावेळी मा. श्री. डॉ. पंजाबराव खानसोळे सर,उपायुक्त, मनपा लातूर, श्री. अमोल दाडगे सर, अध्यक्ष रोटरी क्लब, श्री. प्रा. नागरगोजे सर, उपप्राचार्य, दयानंद महाविद्यालय लातूर, श्री. प्रा. पाटील सर, शाहू महाविद्यालय, श्री. प्रा. वाणी सर, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, श्रीम. श्र्वेता नागने मॅडम, डतएएझ नोडल प्रमुख इत्यादी मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. रॅलीच्या मार्गावर सहभागींनी हातात जनजागृतीचे फलक घेऊन आणि घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. जिल्हा क्रीडा संकुल, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मनपा मुख्यालय मार्गे ही रॅली टाऊन हॉल येथे विसर्जित करण्यात आली.

स्वीप कक्षाचा स्तुत्य उपक्रम

आगामी महानगरपालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी निवडणूक आयोगाच्या ’स्वीप’ कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला. विशेषतः नवमतदार आणि युवा वर्गाला मतदानाचे महत्त्व पटवून देणे हा या रॅलीचा मुख्य उद्देश होता.

मान्यवरांचे प्रतिपादन

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत मौल्यवान आहे. लातूर शहराचा विकास आणि सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, असे आवाहन यावेळी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. रोटरी क्लबच्या सदस्यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकी जपली.

यावेळी लातूर शहर महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, रोटरी क्लबचे सदस्य, विविध शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे रॅली शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

## भारतीय रेल्वेचे ऑल-इन-वन सुपर ॲप, रेलवन ॲप, डिजिटल सुविधेसह अनारक्षित तिकीट बुकिंगवर ३% सवलत देत आहे

**सोलापूर/प्रतिनिधी:** भारतीय रेल्वेने आपल्या ऑल-इन-वन सुपर ॲप, रेलवन ॲपद्वारे, डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि प्रवाशांची सोय वाढवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

सध्या, रेलवन ॲपवरील आर-वॉलेटद्वारे अनारक्षित तिकिटे बुक करणाऱ्या प्रवाशांना कॅशबॅक म्हणून ३% बोनस मिळतो. डिजिटल बुकिंगचा अधिक प्रसार करण्यासाठी आणि कॅशलेस पेमेंट पद्धतींच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी, आता रेलवन ॲपवर उपलब्ध असलेल्या आर-वॉलेट वगळता इतर सर्व डिजिटल पेमेंट पद्धतींद्वारे केलेल्या अनारक्षित तिकीट बुकिंगवर ३% सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत:

- रेलवन ॲपवर आर-वॉलेट व्यतिरिक्त इतर डिजिटल पेमेंट पद्धती वापरून बुक केलेल्या अनारक्षित तिकिटांवर ३% सवलत दिली जाईल.




- रेलवन ॲपवरील आर-वॉलेटद्वारे अनारक्षित तिकिटे बुक करणाऱ्या प्रवाशांना कोणताही बदल न करता, सध्या मिळत असलेला ३% बोनस कॅशबॅक म्हणून मिळत राहील.

ही विशेष डिजिटल सवलत योजना १४ जानेवारी २०२६ ते १४ जुलै २०२६ पर्यंत लागू राहील, ज्यामुळे प्रवाशांना फायदा मिळेल आणि एक अखंड, जलद व पारदर्शक डिजिटल तिकीट बुकिंगचा अनुभव मिळेल.

रेलवन ॲप स्मार्ट, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित डिजिटल उपाय प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे, जे भारतीय रेल्वे नेटवर्कवर डिजिटल सक्षमीकरण आणि प्रवासातील सुलभतेच्या व्यापक दृष्टिकोनाला समर्थन देते. प्रवाशांना या फायद्यांचा लाभ घेण्यासाठी आणि डिजिटल माध्यमांद्वारे त्रासमुक्त अनारक्षित तिकीट बुकिंगचा अनुभव घेण्यासाठी रेलवन ॲपचा पुरेपूर वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रेल्वे वापरकर्ते अँड्रॉइड डिव्हाइसवरील प्ले स्टोअर आणि आयओएस डिव्हाइसवरील ॲप स्टोअरवरून रेलवन ॲप सहजपणे त्यांच्या मोबाइलवर डाउनलोड करू शकतात.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# पत्रकार समाजाचा आरसा - सहकार मंत्री नामदार पाटील

**चाकूर/अजगर मचकुरे :** पत्रकार हा समाजाचा आरसा असून पत्रकाराच्या माध्यमातून समाजाचे प्रतिबिंब उमटते असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले.

चाकूर तालुका पत्रकार संघ व्हॉइस ऑफ मीडिया यांच्यावतीने दर्पण दिनानिमित्त आरोग्य शिबिर व हेल्मेट वाटप कार्यक्रमाचे आयोजन चाकूर येथील कृषी महाविद्यालयात करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.




व्यासपीठावर माहिती संचालक डॉ. शाम टरके, राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, गटविकास अधिकारी संतोष वांगवडे, प्राचार्य डॉ. संतोष कांबळे,विशाल जाधव, सरपंच डॉ. भालचंद चाटे, नरसिंह घोणे, धनंजय कोरे, डॉ. विवेक होळे पाटील, निलेश मद्रेवार, पपन कांबळे, अनिल वाडकर, वर्धमान कांबळे, विष्णू तीकटे, संदीप शेटे, बिलाल पठाण, श्रीनाथ सावंत, ओम केंद्रे, नाथा मद्रेवार, विश्वनाथ पाटील, अर्जुन भोईटे, सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यापुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, पत्रकारिता ही समाजाला न्याय देण्यासाठी असते व चाकूरचे पत्रकार समाजाला न्याय देण्याचा कायम प्रयत्न करत असतात. चाकूरच्या पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी समजून पत्रकारांच्या कुटुंबीयांची व इतर नागरिकांची तपासणीत कार्यक्रम हाती तर घेतलाच तसेच त्यांच्या सुरक्षितेसाठी हेल्मेट वाटपाचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे सुद्धा सहकार मंत्री ना पाटील म्हणाले. पत्रकार हा प्रशासन व लोकप्रतिनिधी मधला दुवा असतो त्यांच्यामुळेच आम्हाला काम करण्यास अधिक सोयीस्कर होते असे सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संग्राम वाघमारे यांनी केले. तसेच व्हॉइस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष विनोद निला, नरसिंह घोणे, माजी सभापती ज्योती स्वामी, सरपंच डॉ. भालचंद्र चाटे, यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत शेटे,गणेश स्वामी यांनी केले.

दर्पण दिनाच्या कार्यक्रमासाठी पत्रकार संघाचे सचिव संजय पाटील, संगमेश्वर जनगावे, माधव वाघ, माधव तरगुडे, शिवशंकर टाक, सदाशिव मोरे, राजकुमार जगताप, अशोक बिराजदार, साखराप्पा वाघमारे, दयानंद सूर्यवंशी, दत्ता मेहकरे, सुशील बाघमारे, विकास स्वामी, दतात्रय बेबडे, सतीश गाडेकर, किशन वडारे, पांडुरंग साळुंके, युसूफ शेख, चेतन होळदांडगे, बसवेश्वर जनगावे, दीपक पाटील, सुनील जाधव, नवनाथ डिंगोळे, रियाज मणियार, गजानन चेऊलवार, बालाजी काटमपल्ले, देविदास हेमनर सह आदींनी पुढाकार घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# जिल्ह्यात युरियाचा पुरेसा साठा उपलब्ध; रासायनिक खतांचा तुटवडा नाही

## तक्रारींसाठी तालुका, जिल्हास्तरीय कृषी कार्यालयाकडे संपर्क साधावा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यामध्ये रब्बी हंगामाच्या पेरण्या पूर्ण होवून पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. जिल्ह्यात रासायनिक खतांच्या संतुलित वापरासाठी विविध प्रकारच्या खतांचे ग्रेड आवश्यक त्या प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत. जिल्ह्यामध्ये खतांची टंचाई परिस्थिती नाही, तरीही काही भागांमधून युरिया या खताच्या संदर्भामध्ये कृषी निविष्ठा विक्री केंद्रामध्ये युरिया खत उपलब्ध असताना शेतकऱ्यांना नाही म्हणणे, वाढीव दराने विक्री करणे व युरिया या खतासोबत इतर कृषी निविष्ठांची खरेदी करण्याची सक्ती करणे अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. शेतकऱ्यांना युरिया संदर्भामध्ये काही तक्रारी असतील त्यांनी तात्काळ तालुकास्तराव कृषी अधिकारी, गुण नियंत्रण यांच्याकडे किंवा जिल्हास्तरावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर किंवा लातूर जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांच्याकडे संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनी केले आहे.

जिल्ह्यामध्ये असणारा खतांचा साठा कृषी विभागाच्या https://adozplatur.blogspot.com/p/box-sizing-border-box-margin-0-padding.html या ब्लॉगवर पाहता येईल. जिल्ह्यामध्ये युरिया या खताच्या १ लाख ६ हजार १२० बॅग पॉस मशीननुसार कृषि केंद्रामध्ये उपलब्ध आहेत. तालुकानिहाय उपलब्ध युरिया खत बॅगमध्ये खालीलप्रमाणे राहतील–

अहमदपूर - १३ हजार २३६ बॅग, औसा - १२ हजार ३३५ बॅग, चाकूर- १ हजार ९४६, देवणी–४ हजार ८०८ बॅग, जळकोट –३ हजार ८५३ बॅग, लातूर –३२ हजार ४९६ बॅग, निलंगा –१४ हजार ८०९ बॅग, रेणापूर –६ हजार ४५७ बॅग, शिरुर अनंतपाळ –५ हजार १३० बॅग, उदगीर –११ हजार ५० बॅग.

तसेच जिल्ह्यामध्ये डीएपी–४१ हजार ४२० बॅग, एनपीकेएस–२ लाख ३२ हजार २९० बॅग, एसएसपी १ लाख ९० हजार ४२३ बॅग उपलब्ध असून रासायनिक खतांची कोणतीही कमतरता नाही. जिल्ह्यामध्ये कृषि निविष्ठा विक्रेत्यांनी युरिया उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना न दिल्यास, जादा दराने विक्री केल्यास व युरिया सोबत लिंकिंगद्वारे इतर निविष्ठा दिल्यास संबंधित विक्रेत्यांवर खत नियंत्रण आदेश १९८५ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित तालुक्यातील निरीक्षकांना लातूर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिल्या आहेत. जिल्हास्तरीय भरारी पथकामार्फत लातूर जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांची वेळोवेळी तपासणी सुरु असून यापुढेही तपासणी मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती लातूर जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी दिपक सुपेकर यांनी दिली आहे.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदासाठी तरुणांना मोफत प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**लातूर/प्रतिनिधी :**भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेची तयारी करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे नवयुवक आणि नवयुवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे १९ जानेवारी, २०२६ ते ३ एप्रिल, २०२६ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६६ आयोजित करण्यात येत आहे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींनी १८ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रावर हजर रहावे. या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास आणि भोजन सुविधा पुरविल्या जाणार आहेत.

लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी १३ जानेवारी, २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे मुलाखतीसाठी हजर रहावे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सैनिक कल्याण पुणे यांच्या संकेतस्थळावरून (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून) सीडीएस–६६ कोर्सचे प्रवेशपत्र आणि त्यासोबत असलेल्या परिशिष्टांची प्रिंट भरून सोबत आणावी. प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि त्याने लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. यासोबतच संबंधित पात्रता प्रमाणपत्रही आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्याशी ईमेल (training. pctcnashikgmail.com), दूरध्वनी (०२५३–२४५१०३२) किंवा व्हॉट्सॲप (९१५६०७३३०६) द्वारे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

# लातूरच्या सर्वांगिण विकासासाठी भाजपाला साथ द्या आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र आणि राज्यातील सरकारच्या सहकार्यातून लातूर शहराचा सर्वांगिण विकास करणे हे भाजपाचे ध्येय आहे. त्यासाठी भाजपा उमेदवारांना बहुमताने विजयी करा, भाजपाला साथ द्या असे आवाहन माजी मंत्री तथा मनपा निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले. भाजपाचे प्रभाग क्रमांक १ मधील उमेदवार देविदास काळे, पंकज शिंदे, ज्योती तिवारी, शेख समिना खय्युम यांच्या प्रचारार्थ आ. संभाजी पाटील निलंगेकर व डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. यावेळी मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर बोलत होते. आ. निलंगेकर म्हणाले की, मागील काळात थोड्या दिवसांसाठी भाजपाला मनपात काम करण्याची संधी मिळाली. या काळात भाजपाने विकास काय असतो हे दाखवून दिले. शौचालयासारख्या मुलभूत सोयी सुविधाही काँग्रेसने लातूरकरांना दिलेल्या नव्हत्या त्या भाजपाने उपलब्ध करून दिल्या. आता शहराचा सर्वांगिण विकास



साध्य करावयाचा आहे. त्यासाठी महानगरपालिकेत भाजपाचा महापौर असणे आवश्यक आहे. लातूरमध्ये भाजपा सत्तेत असेल तर ट्रिपल इंजिन सरकारचा फायदा लातूरकरांना होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी भाजपाच्या पाठिशी खंबीरपणे उभे रहावे, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले.

डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनीही मतदारांना विकास कामांसाठी भाजपाला बळ देण्याची साद घातली. तत्पूर्वी त्यांनी प्रभाग एकमध्ये पदयात्राही काढली. या बैठकीस मंडलाध्यक्ष सुरेश जाधव, विजय काळे, काकासाहेब गडदे, व्यंकट सरवदे, गजनाथ थत्ते, संतोष तिवारी, अभिजीत मदने, महेश धायगुडे, अनंत श्रीगिरे, मनोज काळे, करण हाके, डिगंबर भोकरे, सदानंद श्रीगिरे, ज्ञानेश्वर भोकरे यांच्यासह भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सरस्वती महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पांडुरंग गोरे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

# दयानंद कला महाविद्यालयाच्या ॲनिमेशन विभागाची मुंबईतील असेम्ब्लाज एंटरटेनमेंट स्टुडिओला शैक्षणिक सहल

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील ॲनिमेशन विभागाची शैक्षणिक सहल मुंबई येथील असेम्ब्लाज एंटरटेनमेंट स्टुडिओ येथे आयोजित करण्यात आली. या सहलीत ॲनिमेशन विभागातील २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना ॲनिमेशन व व्हीएफएक्स प्रोडक्शन प्रक्रियेची सविस्तर माहिती देण्यात आली. स्टुडिओमधील विविध विभागांची ओळख करून देत प्रत्यक्ष प्रोडक्शन पाईपलाईन समजावून सांगण्यात आली. यावेळी कंपनीचे सीईओ श्री. अर्जुन माधवन यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांची ओळख करून घेतली.

प्रोडक्शन हेड श्री. स्वप्निल कोटकर यांनी विद्यार्थ्यांना जिद्दीने



काम करण्याचा सल्ला देत, ''कोणीही जन्मतः क्रिएटिव्ह नसतो, स्वतः ला क्रिएटिव्ह बनवावे लागते'' असे मार्गदर्शन केले.

तसेच ॲनिमेशन डिरेक्टर श्री. चेतन तहसीलदार व को–हेड श्री. विधीत कुंद्रा यांनी कंपनीने केलेल्या कामांचे व्हिडिओ, ब्रेकडाऊन इमेजेसच्या माध्यमातून सादरीकरण केले. यामध्ये नुकताच प्रदर्शित होऊन बॉक्स ऑफिस रेकॉर्ड तोडणारा 'छावा' सिनेमा तसेच नेटफ्लिक्सवरील 'वूल्फ किंग' वेब सिरीज यांचा समावेश होता.

ही शैक्षणिक भेट यशस्वी होण्यासाठी प्रसिद्ध ॲनिमेटर श्री. सतीश थोकाडे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच राहुल, विश्वजीत व स्नेहा यांनी व्यवस्थापनासाठी मोलाची मदत केली.

यावेळी विशेष आनंदाची बाब म्हणजे ॲनिमेशन विभागाच्या २०१४ च्या बॅचमधील विद्यार्थी श्री. महेश राऊत यांची स्टुडिओमध्ये अचानक भेट झाली. त्यांनी नुकतीच ही कंपनी जॉइन केली असून, त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या अनुभवांविषयी माहिती दिली व मार्गदर्शन केले.या सहलीसाठी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमनजी लाहोटी, सचिव श्री. रमेशजी बियाणी तसेच दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

या सहलीदरम्यान ॲनिमेशन विभाग प्रमुख डॉ. दुर्गा शर्मा, प्रा. इरफान शेख व प्रा. पूजा खोंडे विद्यार्थीसोबत उपस्थित होते.

## महिला यंदा ..

महिला उमेदवारा
अधिक यंदा संधी
मोहिनी जादू पहा
घडवते सुंदोपसुंदी

सिंधूर करेधमाका
ठळकझाली बिंदी
क्षेत्र असू दे कुठले
सर्वत्रनारीचीआंधी

कृष्ण बंधू लाडका
बोटभर जरी चिंधी
कळेशिखंडीमहत्व
भल्यांची उतरेधुंदी

आरक्षण सत्यांमधे
विस्तारी मन रूंदी
कायदा असा सक्त
मान डोलवतो नंदी

पत्नी स्नुषा मुलगी
चल सांभाळे गादी
एकचअपेक्षा मात्र
बनूनयेत ही प्यादी

महिलाराज सशक्त
नव्या युगाची नांदी
हाती आला परिस
संधीची सोने चांदी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# हनुमंतवाडी, मोतीनगर झाले भाजपमय

## प्रभाग ६ मध्ये मतदार भाजपा उमेदवारांच्या पाठीशी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रचाराने वेग घेतला असून प्रभाग क्र. ६ मधील हनुमंतवाडी, मोतीनगर, राजश्रीनगर हा भाग भाजपमय झाला आहे. या भागातील मतदार भाजपाच्या उमेदवारांच्या पाठीशी उभे असल्याचे चित्र दिसून येत आहे.

प्रभाग क्रमांक ६ मध्ये भाजपाच्या वतीने गणेशअप्पा गवारे, सौ. ज्योती आवसकर, ॲड. मिना गायकवाड–पाटील व गौरव काथवटे हे उमेदवार निवडणूक लढवित आहेत. सोमवारी उमेदवारांनी प्रभागातील हनुमंतवाडी, मोतीनगर, राजश्रीनगर या भागात प्रचार फे री वाढून मतदारांच्या भेटी–गाठी घेतल्या. भाजपाचे जाहीरनामा पत्र मतदारांना सुपूर्द केले.

या प्रचार फेरीत उमेदवारांसह गोवर्धनदास भंडारी, राहुल भुतडा, सुवर्णा चिंताले, कमलाकर डोके, घायाळ, बलदेव कतारी, दत्ता बोरुळे,



सतिष माने, महेश बरगले, लताताई घायाळ यांच्यासह प्रभागातील मान्यवर सहभागी झाले होते.

भाजपाच्या विजयाच्या घोषणा देत ढोलताशांच्या गजरात ही प्रचार रॅली निघाली. परिसरातील प्रार्थना स्थळांमध्ये जावून दर्शन घेत उमेदवारांनी मतदारांशी संवाद साधला.

केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने राबविण्यात येणाजया विविध योजनांची माहिती मतदारांनादिली. भविष्यात लातूर शहर आणि प्रभागाच्या विकासासाठी भाजपाने आखलेल्या योजनांची माहितीही मतदारांना देण्यात आली. केंद्र आणि राज्यात भाजपाचे सरकार आहे. त्यामुळे लातूर शहर महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आली तर प्रभागाचा विकास गतीने होणार आहे. यामुळे मतदारांनी भाजपाच्या चारही उमेदवारांना बहुमताने विजयी करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६